नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५५ * अंक १९१ * | * नागपूर * | रविवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त



## १ जुलैनंतर नावनोंदणी केलेल्या मतदारांना यंदा मतदानाचा अधिकार नाही

# मनपा निवडणुकीत राज्य आयोगाची मतदारयादीच ग्राह्य

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ११ :

पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने अंतिम केलेली 1 जुलै 2025 रोजीची मतदारयादीच वापरली जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे त्यानंतर मतदार नावनोंदणी केलेल्या नागरिकांना मतदानाचा अधिकार या निवडणुकीत मिळणार नाही. आयोगाच्या माहितीनुसार, यंदाच्या निवडणुकीत सुमारे 35 लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

यापूर्वीच्या महापालिका निवडणुकांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मतदारांची यादी घेऊन प्रभागनिहाय आणि मतदान केंद्रनिहाय फोड करण्यात येत असे. मात्र, या वेळी राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट आदेश जारी केले आहेत की, स्थानिक प्रशासनाने स्वतंत्र मतदारयादी वापरू नये. फक्त आयोगाकडून पुरवलेली अधिकृत यादीच निवडणुकीसाठी ग्राह्य धरावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून स्वतंत्र यादी घेतली जाणार नाही, तर राज्य निवडणूक आयोगाने पाठवलेली अंतिम यादीच निवडणुकीचा आधार ठरणार आहे.



निवडणूक अधिकारी प्रसाद काटकर यांनी माहिती दिली की, राज्य निवडणूक आयोगाकडून मतदारयादी महापालिकेला प्राप्त झाली आहे. आता ती प्रभागनिहाय फोडण्याचे काम लवकरच सुरू केले जाणार आहे. पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी 1 जुलै 2025 रोजी अंतिम करण्यात आलेली यादीच वापरली जाणार आहे, असे ते म्हणाले. त्यांनी सांगितले की, आयोगाने याच यादीचा वापर राज्यातील इतर महापालिकांच्या निवडणुकांसाठीही करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सर्वत्र एकाच तारखेनुसार अंतिम यादी लागू राहील.

1 जुलैनंतर मतदार म्हणून नावनोंदणी केलेल्या नागरिकांना या निवडणुकीत मतदानाचा अधिकार मिळणार नाही. यामुळे गेल्या काही महिन्यांपासून वयाची अट पूर्ण करून नावनोंदणी केलेल्या नव्या मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागणार आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, ही बाब अनेक मतदारसंघांमध्ये तरुण मतदारांवर परिणाम करणारी ठरू शकते, असे नमूद करण्यात येत आहे.

### निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात

निवडणुकीची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. निवडणूक आयोगाकडून लवकरच आचारसंहितेची अंमलबजावणी होण्याची शक्यता असून, त्यानंतर काही आठवड्यांतच निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रसाद काटकर यांनी सांगितले की, महापालिकेच्या निवडणुकीसाठी सर्व तयारी सुरू असून, आयोगाकडून वेळापत्रक मिळताच प्रशासन तातडीने कृती आराखडा अमलात आणेल. निवडणूक पारदर्शक, निष्पक्ष आणि सुरळीत पार पडावी यासाठी सर्व यंत्रणा सज्ज आहे, असे ते म्हणाले.

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी अंतिम प्रभागरचनेला राज्य सरकारकडून मान्यता मिळालेली आहे. पुढील काही दिवसांत प्रभागनिहाय आरक्षण जाहीर केले जाण्याची शक्यता आहे. आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर निवडणुकीसाठी अधिकृत प्रशिक्षण प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. अधिकारी व कर्मचारी यांना मतदान केंद्र, मतमोजणी केंद्र आणि निवडणूक प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.

या निवडणुकीतही 2011 च्या लोकसंख्येचा आधार घेतला जाणार आहे. पुणे महापालिकेच्या 2017 च्या निवडणुकीनुसार 41 प्रभाग होते. या वेळीही 41 प्रभागांमधून 165 नगरसेवक निवडून दिले जाणार आहेत. यामध्ये 40 प्रभाग हे चार सदस्यांचे, तर एक प्रभाग पाच सदस्यांचा राहणार आहे. प्रभाग क्रमांक 38 बालाजीनगर, कात्रज आणि आंबेगाव हा सर्वांत मोठा प्रभाग असून, येथील लोकसंख्या 1 लाख 23 हजार इतकी आहे. त्यामुळे या प्रभागातून पाच नगरसेवक निवडून येणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या यादीनुसार पुणे शहरातील एकूण मतदारसंख्या सुमारे 35 लाखांच्या घरात आहे. यात जवळपास 18 लाख पुरुष आणि 17 लाख महिला मतदार आहेत. मागील निवडणुकीच्या तुलनेत ही संख्या सुमारे दीड लाखांनी वाढली आहे. प्रभागनिहाय फोडणी पूर्ण झाल्यावर प्रत्येक मतदान केंद्रावरील मतदारसंख्या जाहीर केली जाणार आहे.

## छोटा राजनचा साथीदार कुख्यात गुंड डी.के. रावला पुन्हा अटक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :



अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनचा दीर्घकाळचा साथीदार आणि कुख्यात गुंड रवी मल्लेश बोऱ्हा उर्फ डी.के. राव याला पुन्हा एकदा मुंबई गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. एका गुंतवणूकदाराला खंडणीसाठी धमकवण्याच्या प्रकरणात त्याच्यासह दोन अन्य विकासकांना, मिमित भुता आणि अनिल परेराव यांना अटक करण्यात आली आहे. या तिघांना न्यायालयात हजर केले जाणार आहे. गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना मागील वर्षीची असली तरी तक्रार नुकतीच नोंदवण्यात आली. या प्रकरणात एका बिल्डरने गुंतवणूकदारांची सुमारे एक कोटी रुपयांची फसवणूक केली होती. गुंतवणूकदारांनी पैसे मागितल्यावर विकासकांनी डी.के. रावची मदत घेऊन त्यांना धमकवण्याचा प्रयत्न केला. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, या दोन्ही विकासकांनी गुंतवणूकदारांकडून पैसे घेतले, मात्र प्रकल्प पूर्ण केला नाही. जेव्हा गुंतवणूकदारांनी परतफेड मागितली, तेव्हा विकासकांनी डी.के. रावला मध्ये टाकून दडपशाही करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी दोन्ही विकासक आणि डी.के. राव यांना अटक करून न्यायालयात सादर करण्याची तयारी सुरू केली आहे.

## एसयूडी लाइफकडुन एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स फंड लाँच

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

एसयूडी लाइफ इन्शुरन्सने एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स फंड लाँच करण्याची घोषणा केली आहे, हा एक नवीन फंड ऑफर आहे जो निफ्टी अल्फा ५० इंडेक्सचा मागोवा घेते, भारतातील सर्वाधिक सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या शेअर्सची ओळख करून देणारा स्मार्ट बीटा बेंचमार्क आहे. नवीन फंड ऑफर (एनएफओ) ६ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत खुला आहे.

हा निर्देशांक भारतातील सर्वात मोठ्या आणि सर्वाधिक तरल कंपन्यांमधील अव्वल ५० शेअर्सचा समावेश करतो. हे शेअर्स त्यांच्या "अल्फा"च्या आधारे निवडले जातात , जे त्यांच्या अल्फाच्या आधारे निवडले जातात, जे जोखीम समायोजित केल्यानंतर व्यापक बाजारपेठेपेक्षा चांगले प्रदर्शन करण्याची प्रत्येक स्टॉकची क्षमता मोजते. निर्देशांकातील प्रत्येक स्टॉकचे वजन त्याच्या अल्फा स्कोअरद्वारे निश्चित केले जाते, ज्यामुळे परिमाणात्मक विश्लेषणावर आधारित कामगिरी-केंद्रित पोर्टफोलिओ तयार होतो.

या लाँचबद्दल बोलताना, एसयूडी लाईफचे मुख्य गुंतवणूक अधिकारी श्री. प्रशांत शर्मा म्हणाले - "हा फंड गुंतवणूकदारांना इक्विटीमध्ये गुंतवणूक करण्याच्या अधिक विचारशील पद्धतीची सुविधा देण्याबद्दल आहे. केवळ बाजाराच्या आकाराचा मागोवा घेण्याऐवजी, ते कालांतराने चांगले परतावा देण्याची क्षमता दर्शविणाऱ्या कंपन्यांच्या कामगिरीवर लक्ष केंद्रित करते. ही कल्पना सोपी आहे, पद्धतशीर राहणे, गुंतवणूक करत राहणे आणि डेटाला निर्णय घेण्यास परवानगी देणे. युलिप शुल्कावरील ०% जीएसटीच्या अतिरिक्त फायद्यासह, पॉलिसीधारक आता कार्यक्षमता आणि संभाव्य वाढीचा आनंद घेऊ शकतात."

बाजारातील बदलत्या गतिमानतेनुसार चपळता सुनिश्चित करून, निर्देशांक तिमाहीत पुनसंर्तुलित केला जातो.हा फंड क्षेत्रनिरपेक्ष दृष्टिकोनासह सातत्यपूर्ण अल्फा साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवतो, ज्यामुळे जोखीम संतुलित ठेवत संपूर्ण अर्थव्यवस्थेतील संधींचा लाभ घेता येतो. मिड-कॅप बायस आणि उच्च-अल्फा घटकांवर लक्ष केंद्रित करून, हा फंड इक्विटी गुंतवणुकीसाठी स्मार्ट, डेटा-नेतृत्वाच्या दृष्टिकोनाद्वारे भारताच्या विकासाच्या कथेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या पॉलिसीधारकांसाठी योग्य आहे.

# अजित पवार यांचा खडकवासला दौरा

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ११ :

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खडकवासला विधानसभा मतदारसंघात विविध विकासकामांचा आढावा घेतला. पहाटेपासून सुरू झालेल्या या दौऱ्यात त्यांनी वारजे, आहिरेगाव, धायरी आणि नांदेड सिटी परिसरातील प्रकल्पांची पाहणी केली. या वेळी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



अजित पवार यांनी वारजेतील चौधरी चौक येथून पाहणी दौऱ्याला सुरुवात केली. वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुर्दशा, आणि नागरिकांच्या तक्रारी या विषयांवर त्यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. विकासकामे वेळेत पूर्ण झाली पाहिजेत, नागरिकांना अडचण होणार नाही याची दक्षता घ्या, अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग वाढल्यास शिवणे पूल पाण्याखाली जातो. त्यामुळे पूल उंच करण्याचे आदेश उपमुख्यमंत्र्यांनी दिले. वारजे-शिवणे पुलाची तसेच धायरी परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या धायरी डीपी रोड आणि कात्रज चौकातील उड्डाणपूल कामांची त्यांनी सविस्तर पाहणी केली.

आहिरेगाव परिसरात नागरिकांनी विविध तक्रारी मांडल्या. यावेळी स्थानिकांनी त्यांना मंदिरात येण्याचे निमंत्रण दिले असता अजित पवार म्हणाले, मी पहाटे पाच वाजता उठतो. एकतर मला देव-देव करायला लावा किंवा विकासकामे करायला सांगा, या वक्तव्याने नागरिकांमध्ये हशा पिकला, पण त्यातून त्यांनी विकासकामाला प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले.

## विरोधक घेणार निवडणूक आयुक्तांची भेट
# राज ठाकरे, फडणवीसांना निमंत्रण

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने येत्या 14 ऑक्टोबर रोजी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेण्याचे निश्चित केले आहे. या भेटीला मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे देखील उपस्थित राहणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी दिली आहे.

संजय राऊत म्हणाले की, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांच्याकडे हे शिष्टमंडळ जाणार आहे. निवडणूक आयोग ही एक संवैधानिक संस्था आहे आणि राज्यात सर्वच राजकीय पक्षांच्या काही समस्या आहेत, त्या मांडण्यासाठी ही भेट आयोजित करण्यात आली आहे.

संजय राऊत म्हणाले की, सुलतानी-अस्मानी दोन संकटांशी सामना करताना मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या करत आहे. पॅकेजच्या नावाखाली कशी धुळफेक केली जात आहे. मोर्चावर टीका टिप्पणी करणं हा महाराष्ट्रातील पूरग्रस्त शेतकऱ्यांचा अपमान आहे.

आजचा हंबरडा मोर्चा जो आहे, हा शेतकऱ्यांचा आक्रोश, हंबरडा फक्त देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत नाही, तर महाराष्ट्रातील आक्रोश, हंबरडा दिल्लीपर्यंत पोहोचावा यासाठी हा मोर्चा आहे. 31 हजार कोटींचे पॅकेज देवेंद्र जी मला सांगा, हे पॅकेज फार-फार तर साडेपाच ते सहा हजार कोटींचे आहे. बाकी धुळफेक आहे, यावर मी आता बोलणार नाही.

## बिबट्याच्या हल्लात दोन शेतकरी जखमी

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ११ :

जिल्ह्याच्या विविध भागांमध्ये बिबट्यांचा संचार आणि हल्ले वाढल्याने बिबट्यांचा बंदोबस्त करावा तरी कसा, अशी चिंता वन विभागाला सतावू लागली आहे. बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे वन कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना नागरिकांचा रोष सहन करावा लागत आहे. नाशिक जिल्ह्यात आतापर्यंत बिबट्याचे वर्षभरात आठपेक्षा अधिक बळी गेले आहेत. प्रामुख्याने नाशिक, इगतपुरी आणि सिन्नर या तीन तालुक्यांमध्ये बिबट्याचा अधिक वावर असल्याचे आणि हल्ले झाल्याचे दिसून आले आहे. देवळा तालुक्यातही बिबट्याने आता हल्ले सुरु केले आहेत. शुक्रवारी सायंकाळी बिबट्याच्या हल्ल्यात दोन जण जखमी झाले.

नाशिक तालुक्यातील वडनेर दुमाला, देवळाली कॅम्प, विहितगाव या परिसरात मागील दोन महिन्यात बिबट्याचे हल्ले अधिक झाले.आर्टिलरी सेंटरच्या वसाहत परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात दोन वर्षांच्या बालकाचा बळी गेल्यानंतर परिसरात बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाच्या वतीने पिंजरे लावण्यात आले. पंधरा दिवसांपूर्वी कुरेशी सय्यद यांच्या नातवावर बिबट्याने हल्ला करत त्याला ओढण्याचा प्रयत्न केला होता.

## कोल्हापूरचा हवालदारच निघाला बनावट नोटा तयार करणाऱ्या टोळीचा मास्टरमाइंड



■ महासागर प्रतिनिधी, कोल्हापूर, दि. ११ :

कोल्हापूर जिल्ह्यातील बनावट नोटा तयार करणाऱ्या टोळीचा मोठा भांडाफोड झाला असून, यामध्ये कोल्हापूर पोलिस दलातील हवालदारच मास्टरमाईंड असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मिरज शहरातील महात्मा गांधी चौक पोलिसांनी केलेल्या या कारवाईत पाच जणांना अटक करण्यात आली , त्यांच्या ताब्यातून 1.11 कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणातील मुख्य सूत्रधार हवालदार इब्रार आदम इनामदार (वय 44, रा. कसबा बावडा, कोल्हापूर) असून, त्याच्यासह सुप्रीत देसाई, राहुल जाधव, नरेंद्र शिंदे आणि मुंबईतील सिद्धेश म्हात्रे यांना पोलिसांनी जेरबंद केले आहे. सर्व आरोपींना न्यायालयात हजर केल्यानंतर 13 ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही टोळी 500 आणि 200 रुपयांच्या हुबेहूब बनावट नोटा तयार करून त्या खपवण्याचे रॅकेट चालवत होती. मिरजेत व्यवहारासाठी येणाऱ्या एका व्यक्तीला पोलिसांनी पकडल्यानंतर संपूर्ण रॅकेटचा पदार्फाश झाला. चौकशीतून समोर आले की, या टोळीचे नेतृत्व स्वतः पोलिस हवालदार इब्रार इनामदार करत होता. त्याने कोल्हापूर येथील रुईकर कॉलनीतील ऑफिसमध्ये लॅपटॉप, स्कॅनर, प्रिंटर आणि अन्य उपकरणांच्या मदतीने बनावट नोटा तयार केल्या जात होत्या. इनामदार सध्या कोल्हापूर पोलीस दलात कार्यरत असल्याने, पोलिस विभागातही मोठी खळबळ उडाली आहे. महात्मा गांधी चौक पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे सोलापूर-कोल्हापूर एक्सप्रेस वेवरील निलजी बामणी परिसरात सापळा रचण्यात आला. पोलिसांनी सुप्रीत देसाई याला अटक केली असता त्याच्याकडून 84 बनावट नोटा (500 रुपयांच्या), एकूण 42 हजार रुपये किंमतीच्या सापडल्या.

## राजकारणात नवी समीकरणं?
# भाजपाचा स्वबळाचा नारा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :

महाराष्ट्रातील सत्ता एकत्र, पण मनं मात्र जुळली नाहीत – हे चित्र आता स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अधिक ठळकपणे समोर येत आहे. एकीकडे भाजप स्वबळावर लढण्याच्या तयारीत असून दुसरीकडे शिवसेना युतीसाठी जोरदार प्रयत्न करत आहे.

मराठवाड्यातील अतिवृष्टी, महापूर आणि शेतकऱ्यांच्या नुकसानीवर सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या ३१ हजार कोटींच्या पॅकेजच्या पार्श्वभूमीवर भाजप-शिवसेनेत नव्या राजकीय हालचाली सुरू झाल्या आहेत. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या भाजपच्या विभागीय आढावा बैठकीत खासदार, आमदार आणि पदाधिकाऱ्यांनी स्पष्टपणे ह्यस्वबळाचा सूर लावला. शिवसेना नकोच, अशी भूमिकाही अनेकांनी थेट मुख्यमंत्र्यांसमोर मांडली.

या भूमिकेचा परिणाम म्हणजे फडणवीसांनीही एकत्र लढण्याच्या इच्छेवर काहीसा आवर घालत, स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे संकेत दिले आहेत. याच वेळी शिवसेना मात्र युतीसाठी जास्त जागा देण्याची तयारी दाखवत भाजपला सोबत आणण्याचा प्रयत्न करत आहे. संजय शिरसाट आणि गुलाबराव पाटील यांचे सूरही युती अनिवार्य असेच आहेत. पण भाजपच्या कार्यकर्त्यांचा मूड मात्र वेगळाच. मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यांत भाजप संघटन मजबूत आहे, तर शिवसेनेला उद्धव ठाकरे यांच्याबद्दल असलेल्या सहानुभूतीचा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हीच गोष्ट स्थानिक नेत्यांना अस्वस्थ करणारी ठरली आहे.

दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि नुकसानभरपाईच्या मागणीसाठी हंबरडा मोर्चा काढत सहानुभूतीची लाट निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. सरकारच्या ३१ हजार कोटींच्या पॅकेजवर फसवणुकीचा आरोप करत गावागावांत प्रचार सुरू आहे. याचा काही प्रमाणात फटका महायुतीला बसू शकतो.

आता मोठा प्रश्न असा – भाजप कार्यकर्त्यांच्या इच्छेला मान देईल की शिंदेंना सोबत घेऊन दिलेला शब्द पाळेल? पुढील काही दिवसांत या राजकीय खेळातील पत्ते उघड होतील, हे निश्चित!

# लिज्जतचे कार्य विकासाचे एकआदर्श मॉडेल आणि सर्वांसाठी प्रेरणास्त्रोत

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :

'श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड या महिलांची, महिलांद्वारा महिलांसाठी कार्यरत संस्थेची ६०वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १ ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबईच्या षण्मुखानंद सभागृहात संपन्न झाली.




या निमित्ताने संस्थेच्या देशभरातल्या विविध शाखा विभागांमधून आलेल्या हजारो सदस्य भगिनींना मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित केलेल्या मेळाव्यामध्ये मुख्य अतिथि भारत सरकारच्या सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय अंतर्गत कार्यरत खादी आणि ग्रामोद्योग आयोगाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुश्री रुप राशी, विशेष अतिथि धमार्दाय सह-आयुक्त सुश्री सुवर्णा खंडेलवाल जोशी, आयोगाचे महाराष्ट्र राज्य निदेशक योगेश भामरे तसेच संस्थेचे अनेक शुभचिंतक उपस्थित होते. संस्थेच्या परंपरेनुसार मुख्य अतिथी व विशेष अतिथींच्या शुभहस्ते दिप प्रज्वलन करुन या स्नेह संमेलनाचा शुभारंभ करण्यात आला.

या स्नेह संमेलनाच्या मुख्य अतिथि सुश्री रूप राशी यांनी लिज्जत संस्थेने केलेल्या या सन्मानाबद्दल संस्थेचे आभार मानले आणि म्हणाल्या, "लिज्जत पापह' या नावाशी मी लहानपणापासून ओडलेली आहे. जवळजवळ ६५ वर्षांपासून या 'स्वादाशी आपण सर्वच परिचित आहोत. मी यावेळी आवर्जुन सांगू इधिछते की. 'मी माज्या मार्गदर्शक गुरुंकडून हे शिकले की आपण असे काम, कार्य करावे की जे इतरांसाठी प्रेरणादायी असेल आणि ज्याने समाजाचे कल्याण सुद्धा होईल, आणि मी हे आत्मविश्वासाने सांगते की, लिज्जत ने असे कार्य करुन दाखविले आहे. लिज्जतचे कार्य हे स्वनिर्मित असून स्वतः साकारलेले आहे, त्यांनी कोणाचे अनुकरण केलेले नाही, आणि आज लिउजतने स्वबळावर बऱ्याच उद्योजकांसाठी असा उद्योग सुरु करण्याची प्रेरणा / विकासाचे एक आदर्श उदाहरण तपार करून ठेवले आहे. आपण आधुनिक उच्च शिक्षण घेतो, पण लिज्जतने इतक्या साऱ्या महिलांना एकत्रित करून फुड इंडस्ट्रीमध्ये इतकी उत्कृष्ट गुणवता सातत्याने कायम टिकवून ठेवली आहे, ज्यासाठी तुम्हा सर्व भगिनींना माझे नमन. आपण पाहतो अनेक लोक अनेक क्षेत्रात प्रयास करतात, पण लिज्जत प्रमाणे गुणवत्ता व मानकीकरण मेंटेन्ड करणे, तेही संपूर्ण भारतभरात, ही एक अशक्य गोष्ट आहे. जी लिज्जतने शक्य करून दाखविली आहे आणि भारताची क्षमता लिज्जतने सिद्ध केली आहे.

उद्योग सुरु करण्यामध्ये दोन गोष्टी महत्त्वाच्या गुणवत्ता आणि घोग्य मूल्य, या दोन्ही गोष्टींचा समन्वय राखणे हे सोपे नाही आणि यातून विकासाचे एक आर्दश मडिल तयार करणे हे अधिक कठीण काम आहे. पण मला विश्वास आहे, यासर्व गोष्टी आम्ही लिज्जतकडून शिकून इतर क्षेत्रात पण उपयोगी आणू शकती. त्या पुढे म्हणाल्या, 'सहयोगातून सामर्थ्य याचा परिचय लिज्जतने दिला आहे. आज के.वी.आय.सी.चा टर्नओवर १.७०,००० करोड आहे. ज्यात लिज्जत संस्था अग्रणी आहे. आयोगाची साथ व मार्गदर्शन लिज्जत संस्थेला या पुढे ही असेच नेहमी मिळत राहिल."

यावेळी या स्नेह सम्मेलनाच्या विशेष अतिथि सुश्री सुवर्णा खंडेलवाल जोशी यांनी, ६६ वर्षांपासून कार्यरत असलेल्या, धार्मिकता व महिलांना पुढे आणणाऱ्या संस्कृतीला जोपासणाऱ्या या श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापडच्या व्यासपीठावर, संस्थेच्या हजारो सदस्य-भगिनींशी संवाद साधण्याची संधी त्यांना आज मिळाल्याबद्दल मनस्वी आभार व्यक्त केले. त्या यावेळी म्हणाल्या, "१५ ते २० वर्षांपूर्वीपर्यंतचा इतिहास पाहता महिलांना पुढे येण्यासाठी शिक्षणाच्या अभावामुळे खूप संघर्ष करावा लागत होता. पण आपल्या संस्थेमध्ये भगिनींना आत्मनिर्भर बनविण्याबरोबरच शिक्षण देण्याची व्यवस्था ही होत आहे. हे जाणून मला अत्यंत आनंद झाला. कारण जिथे काही देण्याची व काही घेण्याची मानसिकता जुळते तिथे खऱ्या अथार्ने महिला सक्षमीकरण होते.

## दुचाकी आणि स्कूटीची धडक चौघे जखमी, दोन गंभीर

■ महासागर प्रतिनिधी नवी मुंबई, दि. ११ :

नवी मुंबईतील पाम बीच मार्गांवर वेगावर नियंत्रण राखता न आल्याने झालेल्या अपघातात दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात सारसोळे गाव सिग्नलजवळ शनिवारी अपरात्री एकच्या सुमारास झाला आहे. या बाबत नेरुळ पोलिसांनी घटनेची नोंद घेतली आहे.

शनिवारी अपरात्री एकच्या सुमारास एक दुचाकीस्वार वाशीहून बेलापूरच्या दिशेने जात असताना त्याचा वाहनावरील ताबा सुटला आणि दुचाकी थेट दुभाजकावर जाऊन आदळली. त्यामुळे तो खाली पडला. त्याचवेळी मागून येणाऱ्या स्कूटीस्वाराने त्या दुचाकीला धडक दिली, ज्यामुळे स्कूटीस्वार आणि त्याच्या मागे बसलेला व्यक्ती दोघेही गंभीर जखमी झाले.

हा अपघात वाशी ते सीबीडी मार्गीकवर घडला आहे. यात नेरुळ सेक्टर २० येथे राहणारा दुचाकी चालक विशाल संजय सूर्यवंशी, (वय २८ वर्ष , धंदा नोकरी ) याने त्याच्या ताब्यातील मो स्कुटी भरधाव वेगाने चालवून रस्त्याच्या कडेला असलेल्या पाण्याच्या लोखंडी पाईपला धडक देऊन गंभीर जखमी झाला.

# महावितरणकडून राज्यातील वीजपुरवठा सुरळीत

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ११ :

वीज कर्मचाऱ्यांच्या २९ पैकी ७ संघटनांच्या संयुक्त कृती समितीने गुरुवार (दि. ९) पासून सुरू केलेल्या ७२ तास-ांच्या बेकायदेशीर संपाच्या कालावधीत महावितरणकडून राज्यभरातील वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यात आला आहे. या संपामध्ये महावितरणमधील सुमारे ६२ टक्के अभियंते, अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले नाहीत.

वीज कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीच्या सर्व मागण्यांशी सुसंगत व सकारात्मक भूमिका महावितरणच्या व्यवस्थापनाने यापूर्वीच बैठकीमध्ये स्पष्ट केली आहे. त्याचे लेखी इतिवृत्तही संयुक्त कृती समितीला देण्यात आले आहे. तरीही दि. ९ ऑक्टोबरपासून ७२ तासांच्या बेकायदेशीर संपाला सुरवात करण्यात आली आहे. वीज ही अत्यावश्यक सेवा आहे व नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम म्हणजेच मेस्मा लागू करण्यात आला आहे. त्यानुसार हा संप बेकायदेशीर असल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.




या तीन दिवसीय संप काळासाठी महावितरणकडून आपत्कालीन पयार्यी व्यवस्था उभारण्यात आली आहे. महावितरणमध्ये गुरूवारी (दि. ९) सुमारे ६२ टक्के कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. यासोबतच २० हजार तांत्रिक बाह्यस्त्रोत कर्मचारी (यंत्रचालक व विद्युत सहायक) कार्यरत आहेत. संपकाळात प्रामुख्याने सुरळीत वीजपुरवठ्यासाठी मुंबई येथील मुख्यालयात मुख्य अभियंता यांच्या नियंत्रणात आपात्कालिन नियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. या कक्षाद्वारे राज्यभरातील वीजपुरवठ्यावर २४ तास लक्ष ठेवण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार मनुष्यबळ व साधनसामग्रीने नियोजन करण्यात येत आहे. यासह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये देखील स्वतंत्र नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. त्याद्वारे राज्यातील वीजपुरवठ्याची स्थिती वरिष्ठ अधिकारी व मुख्यालयास कळविण्यात येत आहे.

संपकाळातील नियोजनानुसार पयार्यी मनुष्यबळ उपलब्ध करण्यात आले आहे. यात संपात सहभागी नसलेले महावितरणचे कर्मचारी, २० हजार बाह्य स्त्रोत तांत्रिक कर्मचारी, महावितरणच्या निवड सूचीवरील कंत्राटदार व कर्मचाऱ्यांची सुरळीत वीजपुरवठ्यासाठी स्थानिक कार्यालय, उपकेंद्र आदी ठिकाणी तात्पुरत्या नियुक्ती करण्यात आली आहे.

संपकाळामध्ये सुरळीत वीजपुरवठ्यासाठी सर्व क्षेत्रीय विभाग कार्यालयांच्या निवडसूचीवर असलेल्या सर्व कंत्राटदारांना आवश्यक साधनसामुग्री, मनुष्यबळ व वाहनांसह संबधीत कार्यालयांमध्ये उपलब्ध झाले आहेत. वीजपुरवठा संदर्भात काही तक्रारी असल्यास नागरिकांनी मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्राचे १९१२ किंवा १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ या २४ तास सुरु असलेल्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा

## वंचित बहुजन आघाडीचे सरपंच यांना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ११ :

दवलामेटी ग्रामपंचायत परिसरात मोकाट कुत्र्यांच्या त्रासाला गावकारी कंटाळून गेले असून, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश मेश्राम यांना उषाबाई सोनारकरने सांगितले कि शाळेत जाणाऱ्या मुलाला तसेच प्रतीक बागडे ला कुत्र्याने चावा घेऊन जखमी केले. ठिक ठिकाणी कुत्र्यांचे समूह तयार झाले आहे.

लावारिस कुत्र्यांच्या त्रास दिवसेंदिवेश वाढत चाललेला आहे. बरेचदा लहान मुलांना नागरिकांना महिलांना कुत्र्यांनी चावा सुद्धा घेतलेला आहे.

रस्त्याने दुचाकी वर जात असतांना अचानक कुत्री धावून पडतात त्यामुळे गाडी वरून नियंत्रण सुटून अपघात होतो. लहान मुलं व महिलांचे रस्त्याने एकटे जाणे भीतीदायक झाले आहे. लवकरात लवकर या लावारिस कुत्र्यांच्या नायनाट करावा अन्यथा वंचित बहुजन आघाडी करून तीव्र आंदोलन करण्यात येईल.

अशा आशयाचे निवेदन दवलामेटी ग्रामपंचायतचे सरपंच गजानन रामेकर यांना परिसरातील नागरिकांतर्फे वंचित बहुजन आघाडीने दिले.

यावेळी नागपूर ग्रामीण तालुका कार्याध्यक्ष नागेश बोरकर, सचिव विनायक घुमटकर, संघटक प्रकाश मेश्राम, जि.प.सर्कल अध्यक्ष राजेश वानखेडे, शाखा अध्यक्ष श्रीकांत रामटेके, अभिजित मेश्राम, संघपाल कांबळे, सिद्धार्थ मेश्राम, राजेंद्रजी गजभिये, सेवक राम गाणार, नितेश पुंडकर, दर्शन बेले, वामन वाहने व मोठया संख्येने कार्यकर्ते तसेच गावकारी उपस्थिती होते.

## ब्लॅकमेल करून ४ वर्षापर्यंत अत्याचार

नागपूरः विवाहितेला तिचे अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन एका व्यक्तीने तब्बल चार वर्षांपयंत तिचे लैंगिक शोषण केले. ही घटना वाठोडा पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. सुधाकर महेर (५०) रा. खरबी असे आरोपीचे नाव आहे.

आरोपी सुधाकर हा एलआयसी एजन्ट आहे. जून २०२१ मध्ये, विवाहित महिलेची सुधाकरशी एलआयसीच्या संदर्भात ओळख झाली. तो विवाहितेच्या घरी एलआयसीचे कागदपत्र दाखविण्यासाठी आणि वेगवेगळ्या योजनांची माहिती देण्यासाठी आला होता. यावेळी विवाहिता घरी एकटीच होती. याचा लाभ घेत सुधाकरने जबरीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या दरम्यान तिचे अश्लील फोटो आणि व्हीडिओही बनवले. त्यानंतर हे फोटो आणि व्हीडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन तो विवाहितेचे सतत शोषण करू लागला. गत चार वर्षांपासून तो विवाहितेचे वेगवेगळ्या ठिकाणी घेऊन जात मानसिक आणि शारीरिक शोषण करीत होता.

# शासकीय निधीचा अपव्यय केल्याप्रकरणी

## मुख्याधिकारी, पूर्व नगरध्यक्ष, उपाध्यक्ष व नगरसेविकेवर गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ११ :

कामठी येथील नगर परिषद मध्ये २०११मध्ये विकास कामे कागदोपत्रि दाखवून शासकीय निधीचा अपव्यवहार झाले असल्याची तक्रार जुने कामठी पोलिसात नरेंद्र राधेश्याम शर्मा यांनी केली होती, यावर पोलिसांनी कोणतीही कार्यवाही न केल्याने न्यायालयात दाद मागितली असता नुकतेच न्यायाल्याने गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन दिले होते. जुने कामठी पोलिसांनी शनिवारला १२०-बी, १६६, ,१९२, २०१, २१२ २१८, ४०९ ,४६८, ४७१ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सविस्तर असे की नगर परिषद च्या प्रभाग क्रमांक १, ३, ४, ५, ७, ८, १०, ११, १२, १३, १४, व १६ मध्ये सिमेंट रस्ता, सिमेंट नाली, एच पी नाली, नाल्याचे कव्हर, पेव्हिंग ब्लॉक, कलवर्ट, व सिमेंट फ्लोरिंग चे काम अर्धवट असूनही पूर्ण रकमेची उचल मे, पारस इंटर प्रायजेस यांच्या कडून करण्यात आली , पारस इंटरप्रायजेस ही पूर्व नगरध्यक्ष मो. शाहजाह यांच्या मालकीची असल्याचे तक्रारीत नमूद आहे.तत्कालीन वेळेत नगर परिषद मध्ये संदीप बोरकर मुख्यअधिकारी तर नगरध्यक्ष मोहम्मद शाहजहाँ सफात अहमद होते.

उपाध्यक्षपदी अहफाज अहमद, अब्दुल शकूर होते या प्रकरणात बहुजन समाज पक्षाची एकमेव असलेली नगर सेविका रमा नागसेन गजभिये यांचा सहभाग असल्याचे गुन्हा दाखल झाल्यावरून समजते! ( मागील १५ वर्षापासून कामठी नगर परिषदेच्या राजकारणात गुंड लोकांचा प्रवेश झाल्यामुळे नगर परिषदेत काम करणाऱ्या कंत्राट दार गुंड ठरवतात.

येथील वास्तविकता पाहता येथील राजकारणात काँग्रेस कडे भाई म्हणजे मो. शाहजहा तर भाजप कडून भाऊ म्हणून ख्याती प्राप्त असलेला रंजीत सफेलकर होय. या भाऊ आणि भाईचा राजकारणात सहभाग झाल्याने यांचेच सहकारी कंत्राटदार बनू लागले या दोघांना स्वतःचे नाव जरी पूर्णपणे लिहिता येत नसले तरी येथील जनतेनी एकाला नगरध्यक्ष तर एकाला उपाध्यक्षपदावर विराजमान केले मो. शाहजहाँ यांच्या वर नगरध्यक्ष होण्या पूर्वी मोकाची कार्यवाही तर रंजीत सफेलकर खुणाच्या गुन्ह्यात मध्यवर्ती कारागृहात आहे.

# नागपूर तहसील कार्यालयात सेवा पंधरवडा उत्साहात



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ११ :

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत नागपूर ग्रामीण तहसील कार्यालयात शेत रस्ता अदालतीचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर व उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या सुनावणीत शेतीसाठी नवे रस्ते देणे, रस्ता अडवणूक, पांदण रस्त्यावरील अतिक्रमण, शेत रस्त्यावरील अडचणी अशा विविध प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्यात आला. या सुनावणीत एकूण ५३ प्रकरणांत कार्यवाही करण्यात आली. याशिवाय, नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणून पारधी समाजासाठी विशेष समाधान शिबीराचे आयोजन नागपूर तालुक्यातील चंद्रपूर रिठी येथील पारधी तांड्यावर करण्यात आले. या शिबिरामध्ये उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, तहसीलदार कल्याणकुमार डहाट, नायब तहसीलदार दिनेश हटवार, सरपंच प्रतिभा भोयर, मंडळ अधिकारी अलका मोडक, तलाठी मोहिणी नेवारे, राजदीप बोदडे, दर्शना भगत, भूषण बेलेकर ग्राम सचिव काकडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## जानवी देशमुख नगराध्यक्ष पदाकरिता उतरणार मैदानात

■ महासागर प्रतिनिधी, काटोल दि. ११ :

काटोल नगर परिषद ओबीसी महिला नगराध्यक्ष पदासाठी आरक्षित असल्याने शिवसेनेचे मिलिंद देशमुख यांची पत्नी जानवी देशमुख शिवसेना (उबाटा) गटाकडून निवडणूक रिंगणात उतरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जानवी देशमुख या उच्चशिक्षित असून त्यांचे शिक्षण, एम ए इंग्लिश, एम ए पॉलिटिकल सायन्स, पुसद शहरातून शिक्षण पूर्ण केले. अनेक वर्षापासून सामाजिक धार्मिक सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय असून प्रशासनाने काटोल नगरपरिषद नगराध्यक्ष पद महिला ओबीसीसाठी राखीव असल्याचे घोषित करताच राजकीय हालचालींना वेग आला आहे. इंडियन नृत्य स्पर्धा, गरबा नृत्य, कोरोना काळात रुग्णाची सेवा करणाऱ्या आशा वर्करांना साडीचोळी देऊन सन्मान करण्यात केला होता.

तसेच गोरगरिबांची सेवा अन्नदान, रक्तदान शिबिराच्या आयोजन करून त्यांनी सामाजिक क्षेत्रात आपला नावाचा ठसा उमटविला होता. शिवसेना (उबाटा) गटाकडून काटोल नगराध्यक्ष पदाची निवडणूक जानवी देशमुख लढणार असल्याची माहिती जानता राजा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मिलिंद देशमुख यांनी दिले आहे. नगराध्यक्ष पद हे जनतेतून निवडून दिले जाणार असल्याने जानवी देशमुख हे येत्या निवडणुकीत कोणाला टक्कर देतील यावर काटोलकरांचे लक्ष वेधले आहेत.

## मनसे वाडीतर्फे खुशीला दहा हजाराची आर्थिक मदत

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ११ :

येथील आदिवासी समाजाची गरीब झोपडीत राहणारी होतकरू मुलगी खुशी राजेंद्र करणाके हिचा उस्मानाबाद ला एम.बी. बी. एस.साठी नंबर लागला होता तिच्या शिक्षणासाठी मनसे वाडीतर्फे सतत तिसऱ्या वर्षी सुद्धा दहा हजाराची आर्थिक मदत मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष अनिल पारखी,जिल्हा सचिव दिपक ठाकरे यांच्या हस्ते देण्यात आली.खुशिला चार वर्षा पर्यंत दर वर्षी १० हजार रुपये अर्थिक मदत करण्याचे आश्वासन मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष अनिल पारखी यांनी केले होते. त्या नुसार ते तिसऱ्या वर्षी सुद्धा खुशीच्या शिक्षणासाठी दहा हजाराची मदत करून तिची आर्थिक अडचण नक्कीच थोडसी दूर झाली आहे मनसेचे नागपूर जिल्हा उपाध्यक्ष अनिल पारखी हे गोर गरीब गरजू लोकांना मदत करण्यासाठी अग्रेसर असतात.दान दात्यांनी सुद्धा समोर येऊन गरीब गरजू लोकांना मदत करण्यासाठी समोर येण्याची अनिल पारखी,दिपक ठाकरे यांनी विनंती केली आहे.

उपस्थित मनसे जिल्हा उपाध्यक्ष नागपूर अनिल पारखी.मनसे जिल्हा सचिव दिपक ठाकरे,विभाग प्रमुख धनराज ठाकरे,विभाग प्रमुख विठोबा घुरडे, राजेंद्र करनाके प्रामुख्याने उपस्थित होते.

# बिल्डरचा वकिलाला २.२३ कोटींचा चुना

### शेतीच्या बदल्यात फ्लॅट देण्याची बतावणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

शेतीच्या बदल्यात फ्लॅट देण्याची बतावणी करून एका बिल्डरने मुंबईच्या एका वकिलाला २.२३ कोटी रुपयांचा चुना लावला. आरोपीने कागदपत्रांवर बनावट सही आणि ई-मेल आयडीचा वापर करून वकिलाची शेतजमीन हडपली. या प्रकरणी हिंगणा पोलिसांनी अंकुश धनविजयच्या तक्रारीवरून आरोपी बिल्डरविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. प्रविण मंशाराम वालदे (५२) रा. जुना बगडगंज, हिंगणा असे आरोपीचे नाव आहे.

धनविजय यांची नागपुरात शेतजमीन आहे. या जमिनीची सध्याची किंमत २.२३ कोटी रुपये आहे. आरोपी प्रविण याच्याशी त्यांची जुनी ओळख आहे.

प्रविणने धनविजय यांना शेतीच्या मोबदल्यात फ्लॅट देण्याची बतावणी करून एक्सचेंज डीड तयार केली. यासाठी त्याने नासुप्रतून शेतीचा नकाशा काढण्यासाठी धनविजय यांची खोटी सही, बनावट ई-मेल आयडी आणि मोबाईल नंबरचा उपयोग केला. नकाशा प्राप्त केल्यानंतर प्रविणने धनविजय यांना त्यांची जमीन शेतजमीन असून फ्लॅटचा सौदा वैध असल्याचे सांगत दिशाभूल केली. त्याने कागदपत्र वाचण्याची संधी न देताच एक्सचेंज डीडवर सही करून घेतली. धनविजय यांना २.२३ कोटींचा चुना लावला. फसवणूक झाल्याचे समजताच धनविजय यांनी हिंगणा पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. हिंगणा पोलिसांनी आरोपी बिल्डर प्रविण वालदे विरुद्ध फसवणुकीच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# शिवसेनेचा संघटन अभियान कार्यकर्ता मेळावा

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. ११ :



हिंदूहयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे ज्वलंत हिंदुत्वाचे विचार घराघरात पोहोचले पाहिजे यासाठी व आगामी होणाऱ्या निवडणुकीसाठी प्रत्येक कार्यकत्यांनी सक्रिय व्हावे हे बिंद्र समोर ठेऊन राज्याचे राज्य मंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत मौद्यात आज रविवार 12 ऑक्टोबर ला सायंकाळी 4 वाजता शिवप्रतिक सेलिब्रेशन लॉन येथे शिवसेनेचा संघटन अभियान कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

मौदा तालुक्यात शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी घराघरात जाऊन पक्षासाठी नेहमत घेतली. निवडणुका कोणत्याही असोत त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

नुकताच होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचा संघटन अभियान व कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आले आहे. यात विविध पक्षातील काही कार्यकर्ते शिवसेनेत ॲड. आशिष जयस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्ष प्रवेश सुद्धा घेणार आहेत. या संघटन अभियान व कार्यकर्ता मेळाव्यात तालुक्यातून शेकडो महिला व पुरुष कार्यकर्ते यात सहभागी होणार आहेत, या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना तालुका प्रमुख नितेश वांगे यांनी केले आहे.

या कार्यक्रमाला जास्तीत जास्त शिवसेना कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना तालुका प्रमुख नितेश वांगे यांनी केले आहे.

# भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापनेसाठी कलार समाजाचे धरणे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

दिनांक ७ आक्टोंबर २०२५ ला महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या वतीने समाजाकरीता भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे व विविध मागण्यांच्या संदर्भात आझाद मैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन करण्यात आले.

भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे, सातारा गॅझेट,हैदराबाद गॅझेट आणि विश्वकर्मा योजने अंतर्गत पारंपरिक मद्य व्यवसाय समाजाला देण्यात यावा, लाडवाणी सुगंधी तेलंग यांना कलाल २५४ मध्ये समाविष्ट करून ओबीसी जात प्रमाणपत्र देण्यात यावे, अशा विविध मागण्यांसाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून समाज बांधव मोठ्या संख्येने आझाद मैदानावर उपस्थित होते व आंदोलनाच्या माध्यमातून समाजाच्या मागण्यांचा आवाज सरकारपर्यंत पोहचविण्याचे काम समाजबांधवांनी संघटनेच्या माध्यमातून केले.

यावर सरकार काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष वेधून आहे. कारण गेल्या चार वर्षांपासून संघटनेच्या माध्यमातून आर्थिक विकास महामंडळ व अन्य मागण्यांची मागणी करीत आहे. परंतु सरकार वारंवार फक्त आश्वासन देत असल्याने दिनांक ७ आक्टोंबरला संघटनेचे अध्यक्ष सागर समुद्रवार, सरचिटणीस संतोष खंबलवार, राज्य कार्याध्यक्ष रविंद्र हटवार,प्रवक्ता रमेश लांजेवार, महिला अध्यक्ष सिमा खंबलवार, मराठवाडा अध्यक्ष संजय हिवाळे, विदर्भ अध्यक्ष संजय हटवार, यांनी गिरगाव चौपाटी येथे जलसमाधी आंदोलन करण्याची घोषणा केली होती.परंतु सरकारने आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन संघटनेचे आंदोलन आझाद मैदानावर वळविले. याठीकाणी समाजबांधवांनी आपला संयम बाळगून आझाद मैदानावर शांततेत आंदोलन केले.

या आंदोलन स्थळी अनेक मान्यवर आमदार व माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी आवर्जून भेट दिली यामुळे समाजबांधवामध्ये एक नवी उर्जा निर्माण झाली. यानंतर मुंबई पोलिस प्रशासनाच्या माध्यमातून अतुल सावे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री (महाराष्ट्र राज्य) यांना मंत्रालय मुंबई येथे जाऊन भेट घेतली आणि निवेदन देण्यात आले व भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या बाबतीत व इतर मागण्यांच्या संदर्भात चर्चा करण्यात आली. यानंतर आंदोलनाची दखल घेऊन कलाल-कलार समाजाकरीता आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचे ठोस आश्वासन मंत्री महोदयांनी दिले.

## रस्त्यावरील मोकाट जनावरांमुळे त्रास

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. ११ :

नरखेड शहराच्या रस्त्यावरील मोकाट गायांची प्रजाती जास्त प्रमाणात आहे. नरखेड शहराच्या बाजारात या मोकाट गायी रस्त्यावरील बसतात. या मोकाट जनावरांमुळे नरखेड वासियांना व इतर लोकांना खूप त्रास होतो. जर नरखेड शहराची स्थिती अशीच राहली तर एक दिवस असा येईल की लोकांना हे गाव सोडावे लागणार. लोक बाजारातून गाडी चालवतात आणि रोडच्या मधोमध्ये मोकाट जनावरे बसले राहते. या कारणा मुळे गाडी चालवणारी लोक कंटाळून गेली आहेत. लोक गाड्यांचे सायरन वाजवतात तरीही मोकाट जनावरे रस्त्याच्या बाजूला होत नाही. कधीकधी तर छोटासा अपघात सुद्धा या रस्त्यावरील होतो, जेव्हा या रस्त्यावरील मोकाट गायी उभ्या व बसल्या असतात.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**

ई-निविदा सूचना क्रमांक: 06-2025-जीएसयू-इलेक्ट-जी

सीपीएम. गति शक्ती, मध्य रेल्वे. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सोलापूर खालील कामांसाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहे. 01. कामाचे नाव: कलबुर्गी स्टेशनवर नवीन पिट लाईनच्या तरतुदीशी संबंधित कामाचा इलेक्ट्रिकल जनरल सर्व्हिसेस भाग. (पुनर्निर्माण), 02. कामाची अंदाजे किंमत: रु. 1,76,96,884.34, 03. बयाणा रक्कम: रु. 2,38,500.00, 04. 1/1 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 (बारा) महिने. 05. देखभाल कालावधी: स्थापना सुरू झाल्यापासून / हाती घेतल्यापासून 12 (बारा) महिने. 06. www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 03.11.2025 दुपारी 3.00 वाजेपर्यंत. 07. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 03.11.2025 दुपारी 3.30 वाजेनंतर. 08. वेबसाइट तपशील: www.ireps.gov.in 09. टीप: संभाव्य निविदाधारकांना www.ireps.gov.in या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो. ANJ-63

तिकीटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा.



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांक SUR/L/T/2025/19. कामाचे नाव: दुरुस्ती आणि देखभाल वेळापत्रक अ, ब, क आणि ड तपासणी ज्यामध्ये ग्रीप्स च्या पॉवर कारचे एस्कॉर्टिंग समाविष्ट आहे. सोलापूर विभागातील एलएचबी गाड्यांच्या पॉवर कारमध्ये एक वर्षासाठी डीए सेट बसवा. अंदाजे किंमत: 2,38,36,132.28/-, बोली सुरक्षा: 2,69,200/-, पूर्णता कालावधी: 12 महिने, ऑफरची वैधता: 60 दिवस. निविदा क्रमांक SUR/L/T/2025/20. कामाचे नाव: दुरुस्ती आणि देखभाल कमिन्सच्या पॉवर कारच्या एस्कॉर्टिंगसह वेळापत्रक अ, ब, क आणि ड तपासणी सोलापूर विभागातील एलएचबी गाड्यांच्या पॉवर कारमध्ये एक वर्षासाठी डीए सेट बसवा. अंदाजे किंमत: 2,69,12,365.91/-, बिड सुरक्षा: 2,84,600/-, पूर्णता कालावधी: 12 महिने, ऑफरची वैधता: 60 दिवस, वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 03/11/2025 दुपारी 3 वाजता, बिड सुरक्षा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरला जाईल. ANJ-64

तिकीटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा



कार्यालय
**ग्रामपंचायत दवलामेटी**
पंचायत समिती नागपूर,ता.नागपूर .जि नागपूर
ई-निवदा सुचना क्र.१/२०२५/२६ (पहिली वेळ)

ग्रा.पं. दवलामेटी अंतर्गत १५ वित्त आयोग निधी अंतर्गत TATA Ace Gold गार्बेज वेहिकॅल कचरा गाडी खरेदी करण्याकरिता ई-निविदा नोंदणीकृत उत्पादक /पुरवठा धारक यांच्याकडून http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई – निविदा ऑनलाईन प्रसिद्ध करण्यात येत आहे .

सूचना क्रमांक – ०१-२०२५/२६ (ई –निविदा) (पहिली वेळ)

१) दरपत्रक विक्रीचा दिनांक:- १०/१०/२०२५ ला सायंकाळी ६.०० वा प्रसिद्ध करण्यात येईल.
२) दरपत्रक स्वीकृतीचा अंतिम दिनांक :१६/१०/२०२५ ला सायंकाळी ५.०० वा पर्यंत उपलब्ध राहील .
३) दरपत्रक उघडण्याच्या दिनांक:-१७/१०/२०२५ ला सायंकाळी ५.०० वाजता किवा सोईनुसार उघडण्यात येईल.

-स्वा-
सरपंच / उपसरपंच/ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत दवलामेटी
पं.स.नागपूर . जि.पं.नागपूर



**ग्रामिण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद,नागपुर**
**ई-निविदा क्र. 33**
जाहीरात प्रसिध्दी
**(दुसरी वेळ) सन २०२५-२६**

ईंडिया मार्क – 2 हातपंपाचे दुरुस्ती करीता लागणारे सुटे भाग खरेदी करीता दर निश्चिती करण्याबाबत या कामाची ई-निविदा ग्रापापुवि,जि.प.नागपुर कडुन प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर ई-निविदा www.mahatenders.gov.in या बेब साईटवर उपलब्ध आहे.

दिनांक :-

कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद नागपूर



**कार्यलिय ग्राम पंचायत धानला**
पंचायत समिती मौदा, जिल्हा परीषद नागपूर,
ई–निविदा सुचना क्र. ०१,०२,०३ सन २०२५–२०२६
साहीत्य खरेदी करीता (प्रथम वेळ)

ग्राम पंचायत धानला प.स. मौदा जि.प. नागपूर याव्दारे सर्व अधिकृत बांधकाम साहीत्य पुरवठादारास सुचित करण्यात येते कि, सन २०२५–२०२६ मध्ये विविध योजनेचे साहित्य आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याकरिता ई–निविदा मागवण्यात येत आहे. करिता जिल्हा परिषद वेबसाईटवर http.mahatendars.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

| अ. क. | कामाचा तपशील | ई निविदा फी | दर पत्रक विक्रीचा दिनांक | दर पत्रक स्विकृत दिनांक |
|---|---|---|---|---|
| 01 | सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षात स्व निधी (सामान्य निधी) तसेच १५ वित्त आयोग, जिल्हा वार्षीक योजना, मा. आमदार व मा. खासदार स्थानीक विकास निधी, शासन योजना २५१५, अनूसुचित जाती व नवबौध्द घटकांचा वस्तीचा विकास करण योजना व इतर विविध शासन योजना अंतर्गत होणा–या बांधकामा करिता बांधकाम साहीत्य आवश्यकते नुसार पुरवठा करणे. | १०००/. रू. डी.डी. | दि. ०७/१०/२०२५ दुपारी. ०२.३० वाजे पासुन | दि. १३/१०/२०२५ दुपारी. ०१. ३० वाजे पंर्यत |
| 02 | सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षात स्व निधी (सामान्य निधी) अंतर्गत दिवाबत्ती साहित्य आवश्यकते नुसार पुरवठा करणे. | १०००/. रू. डी.डी. | | |
| 03 | सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षात स्व निधी (सामान्य निधी) पाणी पुरवठा नळ योंजना अंतर्गत तसेच १५ वित्त आयोग अंतर्गत पाईप लाईन दुरूस्ती व इतर कामाकरिता लागणारे बांधकाम साहीत्य आवश्यकते नुसार पुरवठा करणे. | १०००/. रू. डी.डी. | | |

निविदेतील अर्टी व शर्ती जिल्हा परिषद नागपूर महाराष्ट्र शासनाच्या http.mahatendars.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.निविदा सादर करण्याची डिजीटल सही अनिवार्य राहील. निविदा शक्यतो व त्याच दिवसी किवा समितीने दिलेल्या दिनांकास उघडण्यात येईल.

सरपंच/सचिव
ग्राम पंचायत धानला

# : धम्मचक्र प्रवर्तन दिन : १४ ऑक्टोबरलाच कां साजरा करावा?

शतकानुशतकांची गुलामगिरी, शोषण, जातिभेद यांना छेद देत नवा युगारंभ केला. हाच तो क्षण होता ज्याने दलित, शोषित, वंचित समाजाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. त्यामुळे १४ ऑक्टोबर हा केवळ दिनदर्शिकेतील एक दिवस नसून, तो आशेचा, स्वाभिमानाचा आणि क्रांतीचा दिवस आहे. धम्मचक्र प्रवर्तनाचा सामाजिक संदेश, धम्मचक्र प्रवर्तन म्हणजे अन्यायाविरुद्ध बंड, पण हिंसेशिवाय. ते माणसाला माणसासमान जगण्याची शिकवण देते.

----------------

बौद्ध धर्म हा स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा अधिष्ठान आहे ज्यात कोणतीही जात नाही, उच्च-नीचपणाचा भेद नाही. त्यामुळे धम्म स्वीकारणे म्हणजे आत्मसन्मान स्वीकारणे. १४ ऑक्टोबर १९५६ हा दिवस भारतीय इतिहासातील एक क्रांतिकारी वळण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह नागपूरच्या दीक्षाभूमीवर बौद्ध धम्माची दीक्षा घेतली.

बाबासाहेबांनी सारनाथच्या धम्मचक्र फिरवणाऱ्या बुद्धांच्या परंपरेशी संगती साधत, आश्विन पौर्णिमेला दीक्षाभूमीवर धर्मचक्र फिरवले. त्या एका कृतीने त्यांनी पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या दास्याच्या साखळ्या तुटल्या आणि समतेच्या धमार्चा नवा प्रवास सुरू झाला.

भारताच्या दीर्घ सामाजिक इतिहासात जातिव्यवस्था ही जखम होती. शेकडो वर्षे दलित समाजाला अपमान, अन्याय, अस्पृश्यतेच्या यातना सोसाव्या लागल्या. डॉ. आंबेडकरांनी आपल्या अभ्यास, संघर्ष आणि त्यागातून या व्यवस्थेविरुद्ध आवाज उचलला.

अखेर त्यांनी ठामपणे जाहीर केले की, मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही आणि आपल्या शब्दाला जागत १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन लाखो जनतेला नवजीवन दिले. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक महत्त्व आहे. या दिवशी बाबासाहेबांनी जे धाडस केले, त्यातून दलित समाजाने आपली गुलाम मानसिकता झटकून टाकली. हा दिवस म्हणजे स्वाभिमान दिन आहे.

काहींना प्रश्न पडतो की, हा दिवस १४ ऑक्टोबरलाच कां साजरा करावा? कारण तो फक्त बाबासाहेबांचा व्यक्तिगत निर्णय नव्हता; तो संपूर्ण समाजाचा नवजीवनाचा क्षण होता. लाखो लोकांनी त्यादिवशीच आपले भविष्य बदलले. एकंदरीत हा दिवस म्हणजे धम्मक्रांतीचा जन्मदिन आहे.

हजारो वर्षे अस्पृश्यतेच्या दाहात जळणाऱ्या समाजाने पहिल्यांदा मी ही माणूस आहे असे ठामपणे जाणले, तो दिवस म्हणजे म्हणूनच १४ ऑक्टोबरला विसरून चालणार नाही. नागपूरची भूमी, लाखोंचा सागर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा तेजोमय संकल्प! तो फक्त एक दिवस नव्हता; तो पिढ्यान्‌पिढ्यांच्या अश्रूंचा शेवट आणि मानवतेच्या नव्या पहाटेचा उदय होता.



या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र आलेल्या जनसमुदायाची अवस्था डोळ्यांसमोर आणली, तर अंगावर शहारे येतात. शतकानुशतकांच्या अन्यायाचे ओझे त्या दिवशी हलके झाले. आता आपणही माणूस आहोत, समान हक्काचे आहोत ही भावना आणि भावनिक दृष्टीकोन त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होती. ते केवळ धर्मांतर नव्हते; ती मानवी स्वातंत्र्याची घोषणा होती.

आज आपल्याला १४ ऑक्टोबरचा वारसा पुढे नेण्याची गरज आहे. कारण जातिव्यवस्था आजही वेगवेगळ्या स्वरूपात दिसते. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की समता, बंधुता आणि स्वातंत्र्य या शिवाय मानवतेला अर्थ नाही. तसेच, हा दिवस आपल्याला शिकवतो की खरी ताकद ही संघटनेत, शिक्षणात आणि विचारांत आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिन केवळ स्मरणोत्सव नसून तो आहे सतत जागवणारा चेतावणीचा नगारा. विषमता, दारिद्र्य, अन्याय अजूनही समाजात आहे, अशा परिस्थितीत आजच्या पिढीसाठी १४ ऑक्टोबरचा संदेश असा आहे की, समता, न्याय आणि करुणा अधिक सामर्थ्याने पसरवण्याची गरज आहे.

हा फक्त एका धर्मांतराचा दिवस नाही. तो भारतीय समाजाच्या पुनर्जन्माचा दिवस आहे. ज्यांनी अस्पृश्यतेच्या अंधःकारातून प्रकाशाकडे वाटचाल केली, त्यांचा हा उत्सव आहे. म्हणूनच आपण हा दिवस केवळ साजरा करावा असे नाही, तर जीवनपद्धतीत उतरवावा.

तो होता मनुष्यत्वाचा उत्सव, तो होता अस्मितेचा पुनर्जन्म, तो होता न्याय, समता आणि बंधुत्वाच्या नव्या वाटचालीचा आरंभ. बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हते, तर मानसिक गुलामीतून मुक्त होण्याचा शपथविधी होता.

त्या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र जमलेला जनसागर पाहताना असे वाटले. जणू अंधाराने त्रस्त झालेले लाखो तारे एका सूर्याच्या प्रकाशाने उजळून निघाले. लोकांच्या डोळ्यांत अश्रू होते, पण ते दुःखाचे नव्हते; ते होते आनंदमुक्तीचे अश्रू. शतकानुशतके अपमान सहन केलेल्या समाजाने पहिल्यांदाच उंच मान करून मोकळा श्वास घेतला.

बुध्दधर्मात जनतेला हवा असणारा ईश्वर नाही, आत्मा नाही, चमत्कार नाहीत, त्यात दुःखावर भर आहे, ऐहिकांविषयी अनास्था आहे, ब्राम्हणी धमार्तील विषमतेची आणि अनाचारांची बाधाही त्याला झालेली आहे, शिवाय भारताबाहेर त्याचा बेसुमार जलद गतीने प्रसार झाल्यामुळे भारताबाहेरील अनेक गोष्टी बौध्दधर्म संघटनेत प्रभावी ठरल्या आहेत, इत्यादी अनेक गोष्टींचा फायदा ब्राम्हणीधर्माने पध्दतशीरपणे घेतला. अशा रीतीने एका बाजूने बौध्दाला आत्मसात करणे आणि दुसऱ्या बाजूने त्याचे उच्चाटन करणे, अशा दुहेरी-दुधारी शास्त्रानिशी बौध्दधर्माशी ब्राम्हणी नेत्यांनी सामना केला. ही खरी शोकांतीका म्हणावी लागेल.

डॉ. आंबेडकरांनी बौध्द धर्म स्वीकारला, धर्मचक्र प्रवर्तन केले पण त्यातून आजच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या सर्व प्रश्नांचा सांगोपांग विचार पुन्हा-पुन्हा केला. तो विचार चालू ठेवायला, त्यातून आजच्या प्रश्नांची उत्तरे शोधायला ते स्वतः राहिले नाहीत, ही एक खरोखरच अत्यंत दुर्दैवी घटना समजली पाहिजे.

१४ ऑक्टोबर हा दिवस निव्वळ तारखेतला आकडा नाही. तो आहे, गुलामीतून मुक्तीचा विजयदिवस, मानवतेच्या धर्माचा पहिला जयघोष आणि आगामी पिढ्यांना दिशा देणारा दीपस्तंभ. म्हणूनच धम्मचक्र प्रवर्तन दिन आपण १४ ऑक्टोबरलाच साजरा करतो. कारण तो दिवस म्हणजे बाबासाहेबांनी दिलेला समतेचा अमर दीप, जो कधीही विझणार नाही.

या दिवशी दीक्षाभूमीवर एकत्र येणारे लाखो अनुयायी हा केवळ उत्सव साजरा करत नाहीत; तर ते आपली माती, आपला अभिमान, आपली क्रांती पुन्हा अनुभवतात. म्हणूनच १४ ऑक्टोबरला धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करणे म्हणजे बाबासाहेबांच्या क्रांतीला अभिवादन करणे आणि आपल्या भविष्याचा मार्ग ठरवणे होय. सर्वांना धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या मंगलमय शुभेच्छा!

■ ■ ■



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : समाज परिवर्तनाचे युगद्रष्टा



मानकीकरण हे आधुनिक जीवनातील गुणवत्ता आणि सुरक्षिततेचे मूलभूत अधिष्ठान आहे. हे उत्पादन आणि सेवांच्या विश्वासार्हतेत वाढ करते, जागतिक व्यापार सुलभ करते आणि नवकल्पना तसेच तंत्रज्ञान विकासाला चालना देते. आंतरराष्ट्रीय मानक देश आणि उद्योगांमधील सहकार्य अधिक बळकट करतात, ज्यामुळे आर्थिक प्रगती आणि ग्राहकांचा विश्वास वाढतो. विश्व मानक दिवस प्रथम १९७० साली साजरा करण्यात आला, ज्याद्वारे मानकीकरणाच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय कराराच्या स्मृतीला अभिवादन करण्यात आले. आज हा दिवस १५० हून अधिक देशांमध्ये साजरा केला जातो आणि ISO, IEC आणि कळव सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या योगदानाचा सन्मान करण्याची संधी देतो. विश्व मानक दिवस हा केवळ मानकीकरणाच्या यशाचा उत्सव नाही, तर एक सामूहिक बांधिलकी आहे – उत्कृष्टता, सुरक्षितता आणि नवकल्पनांच्या माध्यमातून अधिक समन्वयित, टिकाऊ आणि प्रगत भविष्याच्या निर्मितीकडे वाटचाल करण्याचा संकल्प आहे.

# पिस्तूल, काडतूसांसह तरुणाला अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

वाडी पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर एका तरुणाला पिस्तूल घेऊन फिरताना अटक केली. झडतीमध्ये त्याच्याजवळ ५ जीवंत काडतूसही मिळाले. अल्केश प्रमोद गजभिये (२१) रा. धामना असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

गुरूवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास वाडी पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान वडधामनाच्या इस्माईल लेआऊटमध्ये एक तरुण पिस्तूल घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांचे पथक परिसरात पोहोचले. एका पडक्या घरामध्ये पोलिसांना अल्केश मिळाला. झडतीमध्ये त्याच्याजवळ पिस्तूल आणि मॅग्झीनमध्ये ५ काडतूस मिळाले. पोलिसांनी आर्म्स ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवून अल्केशला अटक केली. त्याने पिस्तूल कुठून आणली याचा शोध सुरू आहे. सध्या अल्केश वेगवेगळी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे.

## नाईक तलाव सौंदर्यिकरणाचे काम अर्धवट असल्याने

# नागरिकांमध्ये असंतोष



■ प्रदीप पौनिकर
नागपूर, दि. ११ :

प्रभाग क्र.२० च्या अंतर्गत येण्याऱ्या नाईक तलाव सौंदर्यिकरणाचे काम अर्धवट राहिल्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे. या कामाची पूर्तता होणे आवश्यक आहे जेणेकरून परिसराचे सौंदर्य वाढेल आणि नागरिकांना मनोरंजनाचे ठिकाण मिळेल. तलाव सौंदर्य करण्याचे काम अर्धवट राहिल्यामुळे परिसराचे सौंदर्य वाढले नाही. अर्धवट कामामुळे तलावाच्या आसपास अस्वच्छता निर्माण झाली आहे. तलावाच्या संरक्षण भिंतीचे काम अर्धवट राहिल्याने असामाजिक तत्वांच्या लोकांसाठी हे ठिकाण उघडे झाले आहे. या लोकांकडून गांजा, सिगारेट, दारू पिणे यासारख्या असामाजिक क्रिया केल्या जातात, ज्यामुळे परिसरातील नागरिकांना त्रास होतो. नागरिकांमध्ये या अर्धवट कामाबद्दल असंतोष पसरला आहे. मनपा प्रशासनाने तलाव आणि त्याच्या आसपासच्या परिसराची नियमित देखभाल केली पाहिजे. प्रशासनाने या कामाची पूर्तता करण्यासाठी कारवाई करावी आणि जबाबदार अधिकाऱ्यांना जबाबदार धरावे. मनपा प्रशासनाने तलाव सौंदर्यीकरणाचे काम त्वरित पूर्ण करावे. अन्यथा आम आदमी पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल अशा इशारा स्थानिक नागरिक आणि आम आदमी पक्षाच्या वतीने देण्यात आला. यावेळी प्रदिप पौनिकर, विजय धकाते, चेतन निखारे, मिथुन निमजे, तेजराम साहू, सुरेश हेडाऊ, ललिता फुकटकर, दामू बारापात्रे,महेश पौनिकर, सुरेश काठीवाले, नितेश बांधेकर, सुरेश निखारे, तेजराम मदन, पंकज धकाते, श्रावण हेडाऊ, आशिष निनावे, सुखदेव हेडाऊ, पुरुषोत्तम बोकडे व आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

महासागर
प्रभाग वार्ता

# अग्रसेन चौकात खड्डा




■ प्रमोद जांभूळकर, नागपूर, दि. ११ :

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या गांधीबाग येथील अग्रसेन चौकात सध्या एक मोठा खड्डा नागरिकांच्या जिव्हारी लागत आहे. या खड्डयात पावसाचे पाणी साचल्यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अग्रसेन चौक परिसरात सध्या उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे आधीच रस्त्यांवर धूळधाण, अडथळे आणि वाहतुकीची कोंडी जाणवत असताना आता या खड्डयामुळे समस्या अधिकच गंभीर झाली आहे.

स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधले असले तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. खड्डा इतका खोल आहे की त्यात साचलेले पाणी बाहेरून दिसतच नाही. संध्याकाळी किंवा रात्री अपघात होण्याचा धोका खूप मोठा आहे,असे एका स्थानिक नागरिकाने सांगितले. वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला हा मार्ग दैनंदिन प्रवाशांसाठी जणू एक संकट ठरत आहे. प्रशासनाने त्वरित या खड्डयाची दुरुस्ती करून नागरिकांच्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. अग्रसेन चौकात खड्डा; पाणी साचल्यामुळे नागरिक हैराण

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या गांधीबाग येथील अग्रसेन चौकात सध्या एक मोठा खड्डा नागरिकांच्या जिव्हारी लागत आहे. या खड्डयात पावसाचे पाणी साचल्यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.अग्रसेन चौक परिसरात सध्या उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे आधीच रस्त्यांवर धूळधाण, अडथळे आणि वाहतुकीची कोंडी जाणवत असताना आता या खड्डयामुळे समस्या अधिकच गंभीर झाली आहे.स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधले असले तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. खड्डा इतका खोल आहे की त्यात साचलेले पाणी बाहेरून दिसतच नाही. संध्याकाळी किंवा रात्री अपघात होण्याचा धोका खूप मोठा आहे,असे एका स्थानिक नागरिकाने सांगितले.

वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला हा मार्ग दैनंदिन प्रवाशांसाठी जणू एक संकट ठरत आहे. प्रशासनाने त्वरित या खड्डयाची दुरुस्ती करून नागरिकांच्या समस्येकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

# श्री संताजी मंडळाचे कोजागिरी स्नेहमिलन उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ११ :

दत्तवाडी येथील श्री संत गजानन मंदीरात श्री.संताजी मंडळ डिफेन्स वाडी परिसर तर्फे कोजागिरी स्नेहमिलन कार्यक्रम शुक्रवार १० आक्टोंबर रोजी उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात मंडळाचे सल्लागार पुरुषोत्तम रागीट, गोविंदराव रोडे, शैलेश थोराणे, राजेश थोराणे, वसंतराव इखनकर निशांत मदनकर, संदीप लांजेवार, पुरुषोत्तम लीचडे, मधुकर इखणकर, गोविंदराव रोडे, महेश चरडे, राजेश जिरापुरे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची विधिवत पूजा करून दूध व प्रसाद वितरण करण्यात आले. या वेळी लहान मुले व महिला वगार्चे मनोरंजन आणि स्पर्धात्मक कार्यक्रम घेण्यात आले.



त्यात संगीत खुर्ची, रांगोळी, चित्रकला व जनरल नॉलेज प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आल्या प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्यांना योग्य बक्षिसे देण्यात आले.

त्यानंतर समाज बांधवांचा सामुहीक स्नेहभोजाचा कार्यक्रम झाला सदर व कार्यक्रम यशस्वी करण्या करिता मंडळाचे अध्यक्ष चंद्रशेखर येनुरकर, सचिव सचिन थोराने, कार्याध्यक्ष सुमित चाफले, उपाध्यक्ष नीळकंठ कोचे, सहसचिव अरविंद निरगुळकर, कोषाध्यक्ष सुरज गिरडकर, लेखापरिक्षक अविनाश सालनकर व कार्यकारिणी सदस्य भारत केवटे, विजय नासरे, संजय बेलखोडे, पुरुषोत्तम इखार, प्रकाश घाटोळे, रविंद्र पारधी, भगीरथ ढवळे, किशोर सावरबांधे, अशोक राखडे, शिवानंद चीटकुलवार, गजानन तलमले आदींनी सहकार्य केले.

# हे मतांनी नव्हे तर बेईमानीने निवडून आलेले सरकार



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
भाजप हा पूर्णपणे जातीवादी आणि विभाजनवादी पक्ष असल्याची टीका काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. भाजपचे उद्दिष्ट देशातील समाजात फूट पाडून, धर्म आणि जात याच्या आधारावर राजकारण करणे हेच असल्याचा आरोप त्यांनी केला.

या लोकांनी धर्माचे विष इतके मोठे पेरले आहे की, आज सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांवर जोडा फेकून मारण्याचे कृत्य होत आहे. यापेक्षा देशाचे अजून कोणते दुर्भाग्य असू शकते? असा तीव्र सवाल नाना पटोले यांनी उपस्थित केला.

त्यांनी केंद्र सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरसंघचालक मोहन भागवत यांच्यावर थेट निशाणा साधत म्हटले की, या प्रकारामागे यांच्याच संस्कारांचा आणि विचारसरणीचा परिणाम आहे.

पटोले म्हणाले की, देशाचे सरन्यायाधीशांवर ज्या प्रकारे भ्याड हल्ला झाला, तो अत्यंत निंदनीय आहे. मात्र, या घटनेनंतर केंद्र सरकारने कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. त्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झालेला नाही. हे सरकार मौन का बाळगतेय?

पंतप्रधान मोदी, मोहन भागवत आणि भाजपचे वरिष्ठ नेते का काही बोलत नाहीत? कारण हे कृत्य त्यांच्या माध्यमातूनच झाले आहे, असा गंभीर आरोप काँग्रेस नेते पटोले यांनी केला. त्यांनी भाजपवर संविधान आणि न्यायव्यवस्थेवर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत लोकशाहीला धोका निर्माण होत असल्याचा इशाराही दिला.

पटोले यांनी महायुती सरकारवरही जोरदार हल्लाबोल केला. महायुतीचे सरकार हे जनतेच्या मताने नव्हे, तर बेईमानीने निवडून आलेले सरकार आहे. निवडणुकीदरम्यान जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देण्यात आले होते, पण सत्तेत आल्यानंतर हेच सरकार शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहे, असा आरोप त्यांनी केला.

राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत, कर्जाचा बोजा वाढत चाललाय, पण सरकार मात्र घोषणांवरच थांबले आहे, अशी टीका पटोले यांनी केली. भाजप आणि महायुती हे दोन्ही शेतकरीविरोधी आहेत. शेतकऱ्यांना मदत करू शकत नाही, तर निदान त्यांच्या वेदनांवर मीठ तरी चोळू नका, असे भावनिक आवाहन त्यांनी केले.

राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अलीकडील वक्तव्यावरूनही मोठा वाद निर्माण झाला आहे. नाना पटोले म्हणाले की, जे लोक सत्तेवर येण्यासाठी शेतकऱ्यांना आश्वासन देतात, तेच आज त्यांना नाद लागल्याचे म्हणतात. हे अत्यंत लाजिरवाणे आणि शेतकरीविरोधी वक्तव्य आहे. त्यांनी पुढे सांगितले की, महायुतीने दिलेला जाहीरनामा फसवा होता. कर्जमाफीचे आश्वासन देऊन सत्तेत आलेल्या या सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे.

महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्या होणारे राज्य आहे. राज्यातील परिस्थिती गंभीर असून, सरकार केवळ राजकारणात व्यस्त आहे. शेतकऱ्यांची दुःखं कमी करण्याऐवजी भाजप समाजात द्वेष आणि जातीयतेचे विष पेरत आहे.

संविधान, न्यायव्यवस्था आणि लोकशाही यांच्यावर हल्ला करणाऱ्या या विचारसरणीला जनता आता नक्कीच उत्तर देईल, असा इशारा देत पटोले यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

# मनपाच्या रंग दे नागपूर भित्तीचित्र स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद





■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
नागपूर महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित रंग दे नागपूर या भित्तीचित्र स्पर्धेला महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून आलेल्या तरुण चित्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या तरुण चित्रकारांनी नागपूरच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व नागपुरातील वारसा स्थळांचा नीरी मार्ग व फ्रिडम पार्कच्या भिंतींवर कुंचल्याच्या रंगातून नागपूरचा वैभवशाली इतिहास जिवंत केला. विशेष म्हणजे, चित्रकारांचा उत्साह वाढवीत आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांनी जुना मॉरिस कॉलेज टी पॉईंट ते मानस चौक दरम्यानच्या सीताबर्डी किल्ल्याच्या भिंती वर सुरू असलेल्या स्पर्धा स्थळी स्वतः चित्र रेखाटत स्पर्धेचे उद्घाटन केले.

मनपा आयुक्त यांच्या मार्गदर्शनात व अतिरिक्त आयुक्त श्रीमती पंत यांच्या देखरेखीत 'रंग दे नागपूर' या स्पधेर्चे आयोजन करण्यात आले असून, या स्पधेर्ला शनिवार पासून सुरूवात झाली आहे. ११ व १२ ऑक्टोबर या दोन दिवसात चित्रकार भित्तीचित्रे पूर्ण करणार आहेत. या माध्यमातून मनपाच्या ७५ वर्षांच्या गौरवशाली इतिहासाचे आणि भविष्याचे दर्शन घडविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

१८ वर्षांवरील विद्यार्थी आणि व्यावसायिक अशा दोन गटात ही स्पर्धा घेण्यात येत असून, यात विद्यार्थी गटामध्ये बीएफए, एम एफ ए. एटीडी, गीडी फाईन आर्ट विद्यार्थी यांचा तर व्यावसायिक गटात हौशी चित्रकार आणि फाईन आर्टचे पदवीधर (उत्तीर्ण विद्यार्थी) यांचा समावेश आहे. स्पर्धेत सहभागी होत नागपूरसह मुंबई, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, यवतमाळ, चंद्रपूर व वर्धा या जिल्ह्यातून आलेल्या चित्रकारांनी आपल्या कलेचे प्रदर्शन केले. या स्पर्धेसाठी एकूण ११८ गटांनी प्रवेशिका दिल्या होत्या. त्यापैकी ९२ जणांच्या प्रवेशिका मनपाने दिलेल्या संकल्पनेनुसार पात्र ठरल्या आहेत. प्रत्येक गटामध्ये ३ ते ५ चित्रकारांचा समावेश आहे. जवळपास तीनशेच्या वर चित्रकारांनी एकाचवेळी नागपुरातील या रंगोत्सवात सहभाग नोंदविला.

रंग दे नागपूर स्पर्धेसाठी १) 'नागपूर अॅट ७५': अनेक दशकांतील वाढीचा आणि परिवर्तनाचा प्रवास, २) 'स्वच्छ, हरित आणि स्मार्ट नागपूर': स्वच्छता, हिरवळ आणि स्मार्ट सिटी विकास, ३) नागपूरची संस्कृती, इतिहास आणि वारसा आणि ४) 'नागपूर- द टायगर कॅपिटल ऑफ इंडिया' या चार संकल्पना निश्चित करण्यात आल्या आहेत.

दीक्षाभूमीजवळील सुंदरलाल राय मार्ग (नीरी मार्ग), सीताबर्डीतील फ्रिडम पार्क येथील भिंतीवर तरुण चित्रकारांनी भित्तीचित्रे काढण्यास सुरुवात केली. नीरी मार्गावर विद्यार्थी तर फ्रिडम पार्कवर हौशी तसेच व्यावसायिक चित्रकारांनी भित्तीचित्रे काढली.

नागपुरातील शासकीय चित्रकला महाविद्यालय, अंजुमन कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, महालक्ष्मी जगदंबा कॉलेज, नटराज आर्ट अँड कल्चर कॉलेज, धरमपेठ, ऑरटॉनिक संस्था मानेवाडा, शासकीय चित्रकला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला आहे.

नागपुरातील शासकीय चित्रकला विद्यालय, नटराज आर्ट अँड कल्चर कॉलेजमधील प्राध्यपकांनी तसेच इतर हौशी चित्रकारांनी यात सहभाग घेतला.

आर्णी (यवतमाळ) येथून प्रियंका प्रेम राठोड या स्पर्धेसाठी आल्या आहेत. तसेच छत्रपती संभाजीनगर शासकीय चित्रकला महाविद्यालयातील श्रद्धा सोनवणे, साक्षी पठारे, संकेत गायकवाड, गायत्री काळे व गौरव गवळी यांनी या स्पर्धेत भाग घेतला. ठाणे येथील चित्रकार सुरेंद्र कोहपरे यांनी या स्पर्धेत भाग घेतला.

सकाळपासून या दोन्ही ठिकाणी चित्रकार दाखल झाले होते. नागपूर महापालिकेच्या अमृत महोत्सवानिमित्त तयार केलेल्या टी शर्ट परिधान करून सर्व चित्रकार चित्र काढताना या मार्गावरून जाणारे वाहनचालक उत्सुकतेने पाहत होते तर काही जण थांबून सेल्फी काढताना दिसून आले.

### आयुक्तांच्या हातात कुंचला

महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी व अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांनी भित्तीचित्र स्पर्धेतील स्पर्धकांची भेट घेतली. यावेळी त्यांनी चित्रकारांच्या चित्रकलेचे कौतुक केले तसेच शुभेच्छा दिल्या. यावेळी आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी कुंचला हातात घेऊन फिरविला. यावेळी उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, सहाय्यक आयुक्त राजकुमार मेश्राम, मनपाचे जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, स्पर्धेचे समन्वयक अभिजीत मौंदेकर उपस्थित होते.

### विशेष बक्षिसे..

स्पर्धेतील विद्यार्थी गटातील विजेत्यांना १ लाख रुपयांचे पहिले बक्षीस, ७५ हजार रुपयांचे दुसरे बक्षीस आणि ५० हजार रुपयांचे तिसरे बक्षीस दिले जाणार आहे. तर व्यावसायिक गटातील विजेत्यांना १ लाख २५ हजारांचे पहिले बक्षीस १ लाख रुपयांचे दुसरे बक्षीस आणि ७५ हजार रुपयांचे तिसरे बक्षीस दिले जाणार आहे.

या स्पर्धेत सहभागी झालेल्या चित्रकारांनी महापालिकेच्या या उपक्रमाचे कौतुक केले. नागपुरातील शासकीय चित्रकला महाविद्यालयातील प्रा. अश्विनी घुले म्हणाल्या, महापालिकेचा हा उपक्रम खूपच चांगला आहे. अमृत महोत्सवानिमित्त होत असलेला ही स्पर्धा केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर हौशी चित्रकारांसाठी सुद्धा नागपूरच्या विकासाला चित्रबद्ध करण्याची संधी मिळाली आहे.

**अभिनव संकल्पना - कोहपरे**

ठाणे येथून खास या स्पर्धेसाठी आलेले सुरेंद्र कोहपरे यांनी नागपूर महपालिकेची ही संकल्पना अत्यंत अभिनव असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. शहराच्या सौंदर्यीकरणासाठी असे उपक्रम राबविले जाणे चांगले तसेच चित्रकारांना सुद्धा आपल्या संकल्पांना मूर्त रुप देण्याची संधी अशा उपक्रमातून मिळत असल्याचे सांगितले.

नागपुरातील शासकीय चित्रकला महाविद्यालयात एमएफएच्या पहिल्या वर्षात शिकत असलेल्या प्रियंका प्रेम राठोड हिनेही या उपक्रमाचे कौतुक केले. चित्रकला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी असे उपक्रम आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी महत्वपूर्ण ठरत असल्याचे सांगितले.

# गझल सम्राट सुरेश भटांवरील हिंदी पुस्तकाचे प्रकाशन व 'गीत गझल संगीत संध्या' चे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

*सारेच हे उमाळे आधीच योजलेले*
*सारेच हे जिव्हाळे आधीच बेतलेले*
*सांभाळतात सारे आपापली दुकाने*
*माझेच हे दिवाळे काढून लोक गेले!*

सुरेश भटांच्या गझलेतील शब्द न शब्द अर्थपूर्ण आणि खोलवर विचार करायला भाग पाडणारे आहेत. मराठी रसिकांच्या मनावर त्यांनी अधिराज्य केले.

*जाताना सरणावर इतकेच मला कळले होते*
*मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते!*

या ओळीतून त्यांनी अनेकांच्या जीवनाचा आणि जगण्याचा अर्थ स्पष्ट केला. तेच कविवर्य सुरेश भट यांच्या गझलांवर आधारीत गीत गझल संध्या हा कार्यक्रम आज रविवारी रसिकांच्या काळजाचा ठाव घेणार आहे.

महासागर वृत्तपत्र समुहाच्यावतिने रविवार १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता बनयन हॉल, हिस्लॉप कॉलेज जवळ, चिटणवीस सेंटर, नागपूर येथे आयोजित कार्यक्रमात शाम जैन व श्रुती जैन आपल्या सुमधुर आवाजात सुरेश भट लिखीत गझलांचे सादरीकरण करतील.

तत्पूर्वी, गझल काव्यप्रकार मराठीत रूजवून रसिकांच्या ह्रदयाचा ठाव घेणारे गझल सम्राट सुरेश भट यांच्या गझलांना हिंदी विश्वात परिचित करण्यासह अंतरंग उलगडण्यासाठी त्यांचे शिष्य गझलकार प्रदीप निफाडकर यांनी लिहिलेल्या 'मराठी गझल के उस्ताद सुरेश भट और '.....या हिंदी पुस्तकाचे प्रकाशन मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष अक्षयकुमार काळे यांच्या शुभहस्ते होणार आहे. साहित्यप्रेमी डॉ. गिरीश गांधी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. यावेळी सुरेश भट यांच्या हुबेहूब आवाजात प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर हे सुरेश भट यांच्या रचना सादर करतील.

***आयुष्य संपताना इतकीच खंत होती***
***काही भिकारड्यांना दिलदार मानले मी***
***माझ्या पराभवाची समजूत घातली मी***
***जे वार खोल गेले ते यार मानले मी!***

काळजाचा ठाव घेणाऱ्या अशा अनेक गझल श्रोत्यांना तृप्त करणार असून, कार्यक्रमाला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महासागर परिवारातर्फे करण्यात आले आहे.



## महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनच्या अध्यक्षपदी प्रवीणसिंह परदेशी यांची निवड

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ११ :
अमरावतीमध्ये होणाऱ्या ३८ व्या महाराष्ट्र राज्य तथा तिसऱ्या अखिल भारतीय पक्षीमित्र संमेलनाच्या अध्यक्षपदी राज्य नियोजन संस्थेचे अध्यक्ष प्रवीण परदेशी यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती महाराष्ट्र पक्षिमित्राचे किशोर गठडी यांनी दिली. अमरावती येथील वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेकडे यंदा यजमानपद आहे.




पक्षीमित्रांची संघटन असलेली महाराष्ट्र पक्षीमित्र ही संस्था राज्यात गेली चार दशके कार्यरत आहे. पक्षी अभ्यास, संवर्धन व जनजागृती यासाठी कार्यरत असलेल्या या संस्थेची राज्यस्तरीय तसेच विभागीय स्तरावर पक्षीमित्र संमेलने होतात. अशा प्रकारचे संघटन आणि पक्षीमित्रांचे संमेलने घडवून आणणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असल्याचे गठडी यांनी सांगितले.

छायाचित्रकार म्हणून छाप

संमेलनाध्यक्ष प्रवीणसिंह परदेशी हे त्यांच्या प्रशासकीय सेवेच्या सुरुवातीपासूनच वन्यजीव व पक्षी छायाचित्रकार व वन्यजीव संवर्धक म्हणून संपूर्ण राज्यात परिचित आहेत.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पुनर्वसन तसेच राज्याच्या वन विभागाचे सचिव असताना त्यांनी वन विभागात अतिशय धडाडीने काम करून जंगल व वन्यजीव संवर्धनात आपल्या कार्याचा ठसा उमटविला होता.

महाराष्ट्र पक्षीमित्र सोबत ते गेल्या ३ दशकांपासून जुळलेले असून त्यांनी अनेक संमेलनात उपस्थित राहून संमेलनाच्या आयोजनात सुद्धा मोलाची भूमिका बजाविली होती. सध्या ते वन्यजीव क्षेत्रातील सर्वात जुन्या अशा बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे अध्यक्ष सुद्धा आहेत.

संपूर्ण राज्यात आजवर ३७ राज्यस्तरीय संमेलने व विभाग स्तरावरील ३० संमेलनांचे आयोजन आजवर करण्यात आले आहेत. यावर्षी अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात १ आणि २ नोव्हेंबर २०२५ दरम्यान हे संमेलन होत आहे.




■ नागपूर : *केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या मार्गदर्शनात पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपुर आणि दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नॉर्थ ईस्ट फेस्टिवल ऑक्टेवचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात, पूर्वोत्तर राज्यातील कलावंतांनी नृत्य सादर करीत सर्वांची मने जिंकली.*







दैनिक महासागर
आयोजित


स्व. सुरेश भट

स.न.वि.वि.

सुरेश भट महाराष्ट्राचे थोर गीतकार आणि मराठी विश्वात 'गझल' या लोकप्रिय विधेला जनमानसांपर्यंत पोचविणारे अफलातून व्यक्तिमत्त्व! स्व. सुरेश भट यांना १९७४ साली दैनिक महासागरच्या कार्यकारी संपादक पदावर आमंत्रित करुन त्यांना अमरावतीहून नागपुरला प्रस्थापित केले. त्यांच्या गझल प्रेमाचा बहर नागपूर शहरातच उगम पावला. आता या गझलेने मराठी साहित्य विश्वाला व्यापून टाकले आहे.

अशा गझल संप्रदायाचे आद्यगुरु सुरेश भट यांच्या गझलांना हिन्दी विश्वात परिचित करण्यासाठी त्यांचे अंतरंग शिष्य गझलकार **प्रदीप निफाडकर** यांनी **मराठी गझल के उस्ताद सुरेश भट और...** पुस्तक लिहिले असून ते हिन्दी साहित्य अकादमीने प्रकाशित केले आहे.

त्याचे प्रकाशन मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष माननीय **अक्षयकुमार काळे** यांचे शुभहस्ते संपन्न होईल. समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यविश्व प्रेमी **डॉ. गिरीश गांधी** उपस्थित राहतील.

प्रकाशनानंतर **श्री. शाम जैन व श्रीमती श्रुती जैन** यांच्या सुमधुर गायनाचा गीत गझल संध्या हा कार्यक्रम होईल. भट यांच्या विविध गीतांच्या सोबतच भट यांच्या आठवणींना उजाळा देण्यात येईल.

हा कार्यक्रम **बनयन हॉल (Banyan Hall), चिटणवीस सेंटर, नागपूर येथे रविवार दि. १२ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं. ६.३० वाजता** आयोजित केला आहे. आपण रसिक आहातच. उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

कार्यक्रम व्यवस्था
Ruturang Entertainment
BHAKTI JADHAV PRODUCTIONS

|| विनीत ||
श्रीकृष्ण चांडक यू.एस. लाल राहुल चांडक
आणि समस्त महासागर परिवार


## कबुतरांसाठी जैन मुनींची राजकारणात उडी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाची राजकीय घडमोड समोर आली आहे. जैन मुनींनी आता चक्क राजकारणात उडी घेतली. जैन मुनी नीलेशचंद्र यांनी आज 'शांतिदुत जनकल्याण पक्षाची घोषणा केली. विशेष म्हणजे हा पक्ष आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत उमेदवार उभे करणार आहे.

जैन समाजाचे चिन्ह हे शांतिदूत कबुतर आहे. कबुतरांविरोधात जे आहेत, त्यांच्याशी आमचा वाद आहे. आमचा पक्ष केवळ जैन समाजाची पार्टी नाही, तर जेवढे मारवाडी, गुजराती आहेत. आम्ही एकत्र येत मुंबई मनपा निवडणुकीत उमेदवार उभे करणार आहोत, असा निर्धार जैन मुनी नीलेशचंद्र यांनी बोलून दाखवला. यामुळे अन्य पक्षात चिंता पसरली आहे.

# संकटाचे मळभ दूर होवो

दिवाळीचे मंगलमयी वातावरण अनुभवताना, दीपावलीचे स्वागत करताना जाणवणारी प्रसन्नता आणि या प्रसन्नतेने भारलेला हा सगळा काळ... अर्थात हाच नव्हे तर येणारा प्रत्येक सण आपल्याला दैनंदिन व्यग्रतेतून, व्यस्ततेतून बाहेर पडण्याची संधी देणारा असतो. नाही म्हणायला आम्हा कलाकार मंडळीना साचेबद्ध रुटीन नसते. मात्र ऑफिसमध्ये वेळेत पोहोचणे, अनिश्चित काळासाठी स्वत:ला त्या वातावरणाशी बांधून ठेवणे आणि जॉब संपवून घरातील जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या लोकांसाठी सणांमुळे होणारी वातावरणनिर्मिती हा खरेच खूप मोठा आणि आवश्यक ठरणारा बदल असतो. त्याची आत्यंतिक गरज असते. पहिली बाब म्हणजे सणांची निर्मितीच हा विचार करुन केलेली दिसते. दिवाळीप्रमाणेच वर्षभर येणाऱ्या प्रत्येक सणामुळे आपल्या जीवनामध्ये वेगळा उत्साह निर्माण होत असतो. जगण्याची अभिलाषा, आनंद वाढवणे हेच प्रयोजन असते. असे असताना दिवाळी तर खास असतेच. या सणासाठी प्रत्येकाची आपापल्या क्षमतेनुसार सिद्धता असते. पणती दहा बाय दहाच्या घरात राहणाऱ्यांच्या दारासमोरही तेवते आणि टोलेजंग प्रासादही दिव्याच्या प्रकाशात प्रकाशमान होतात. या दोघांच्या आनंदाची जातकुळी एकच असते. सगळेच भरभरुन आनंद लुटत असतात. दिव्यांमुळे निर्माण होणाऱ्या सकारात्मकतेची गरज प्रत्येक काळात होती आणि राहणार आहे. सध्या आपण नैसर्गिक आपत्तीच्या कचाट्यात सापडलो आहोत. बराचसा भाग जलमय झाला आहे. शेतकरी चतेत आहे. पण यंदा या संकटावर मात करण्यासाठी दिवाळीतील दिव्यांची गरज आहे, असे आपण म्हणू शकत नाही. ती गरज पूर्वीही होती आणि उद्याही असणार आहे.

दिवाळीनिमित्त कुटुंबच नव्हे तर समाजाने एकत्र येणे, मित्रमंडळींनी मजा करणे हे ओघाने आलेच. अगदी काही नाही तर एकटे चालताना दारोदारी पेटलेल्या पणत्या पाहिल्या तरी कमालीचे समाधान मिळते. घरांबरोबरच दुकानामध्ये होणारी रोषणाई, उजळून निघालेला परिसर आपल्याला गुंतवून ठेवतो. या प्रकाशाची आत्यंतिक गरज असते, कारण अंधारलेल्या वातावरणात कोणी कधीच जगण्याला आवश्यक असणारी सकारात्मकता मिळवू शकत नाही. अगदी सध्याचे उदाहरण घ्यायचे तर पडत्या पावसाचाही आपल्याला यथावकाश कंटाळा आला. सततचे कुंद वातावरण आपल्यातील इच्छाशक्तीला मारक ठरत आहे. सततचे सर्द वातावरण आपल्याला नकारात्मकतेकडे नेते. कोणत्याही कामात ऊर्जा रहात नाही, उत्साह वाटत नाही. मात्र प्रकाश ही नकारात्मकता दूर करण्याचे काम करतो. म्हणूनच दिवाळीचे स्वागत दणक्यात व्हायला हवे. अनेकांनी म्हटल्याप्रमाणे दिवाळी खरोखर आपल्या मनातील जळमटे, दाटलेला अंधार, चता-भीती दूर करण्यासाठी येते आणि परिसराबरोबर मनही प्रकाशमान होते. म्हणूनच तिच्या स्वागतात काही कमतरता राहता कामा नये.

दिवाळीमध्ये होणारी खरेदी, एकत्र येत



साजरा होणारा आनंद हे सगळेच आनंददायी असते. आता बाजार मंदावणे, वाढती महागाई हे सारे असले तरी दिवाळीचा आनंद काही कमी झालेला नाही. प्रत्येकजण आपल्या मर्यादेत खर्च करतात, पसंतीचे कपडे वा अन्य गोष्टी खरेदी करतात आणि हा सण साजरा करतात. शिवाय नोकरदारांच्या हातात बोनसरुपानेही पैसा आलेला असतो. त्याचा आनंदही दिवाळीला खास बनवतो. आम्हा कलाकारांना मात्र हे सुख अनुभवता येत नाही. एक वेळ गायक कलाकारांना दिवाळी पहाटच्या निमित्ताने मिळणाऱ्या कार्यक्रमांमधून अर्थार्जनाची संधी मिळते. पण माझ्यासारख्या नृत्य कलाकारांना ती सोयही नसते, कारण एवढ्या पहाटे नृत्य बघायची समाजाची मानसिक बैठक अजून तरी झालेली नाही. यातील विनोदाचा भाग बाजूला ठेवू या, पण काहीही असले तरी दिवाळीचा आनंद तोच असतो.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे यंदाच्या दिवाळीला अवकाळी, अतिवृष्टी आणि त्यायोगे झालेल्या प्रचंड नुकसानीची दाहक पार्श्वभूमी आहे. अतिवृष्टीच नव्हे तर अन्य अनेक प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती सध्या माणसाला सतावत आहेत. मात्र त्याला आपणच कारणीभूत आहोत, हे मान्य केले पाहिजे. निसर्गाच्या वाढत्या असंतुलनाला मानवाची कृतीच जबाबदार आहे. आपण यावर बरीच चर्चा करतो, विचार करतो पण सुधारण्यास आवश्यक असणारे बदल मात्र आचरणात आणत नाही. दुसरे म्हणजे काही गोष्टींची इतकी सवय लागली आहे, गरज निर्माण झाली आहे की, समजत असूनही आपण हे बदल करु शकत नाही. जसे की, प्रत्येकाने स्वतंत्र गाडी वापरण्यापेक्षा एका दिशेने जाणाऱ्या लोकांनी एकच वाहन वापरण्याचा उपाय कितीही स्तुत्य आणि इंधन बचतीच्या दृष्टीने परिणामकारक असला तरी तो प्रत्येक वेळी तो अनुसरणे व्यावहारिक ठरत नाही. थोडक्यात, जीवनशैलीत बदल करणे अत्यावश्यक असले तरी ते शंभर टक्के कृतीत उतरणे शक्य नाही. स्वाभाविकच नैसर्गिक संकटांची टांगती तलवार आता कायमच माणसाच्या डोक्यावर राहणार आहे.

काही वर्षांपूर्वी लोक कोरड्या दुष्काळात करपून जात. आता ओला दुष्काळ त्यांना बुडवतो आहे. आजही वातावरण खूप तापते तेव्हा माणूस एक तरी सर पडावी, असे म्हणतो. सरीवर सरी बरसू लागल्या की त्याचाही त्रास होतो आणि थंडीतही तो अस्वस्थ होतो. म्हणजेच माणूस कोणत्याही स्थितीत समाधानी नसतो. परिस्थितीचा स्विकार करुन मार्ग काढण्यापेक्षा नाही त्याच्या मागे धावण्यात माणूस बरीच शक्ती खर्च करतो. ही मानवी वृत्तीच म्हणायला हवी. तेव्हा आपल्याच करणीने उद्भवलेल्या संकटांच्या मालिकेकडे तटस्थपणे न पाहता, आपल्या चुका लक्षात घेऊन टाळण्याचा प्रयत्न केला आणि सद्यस्थितीत आलेल्या संकटाचा

**दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आसमंतात आनंदाचे वातावरण असले तरी अनेक घरांमधील विझलेले दिवे प्रकाशवाटा अंधारुन टाकत आहेत. कोपलेल्या निसर्गाचे चटके सहन करणारी घरे शेजारी असताना दिवाळीचा आनंद प्रभावित होणे स्वाभाविक म्हणावे लागेल. पण यातही सगळ्यांनी एकत्र येत, संकटावर मात करण्याचा निश्चय करत, पुढाकार घेतल्यास प्रत्येक घरात दिवाळी साजरी होईल. खात्रीने ती अत्यंत आनंदादायी असेल.**

सामना करण्यासाठी एकजुट वाढवली तर खूप काही चांगले साधत येईल. यंदाची दिवाळी हाच संदेश देणारी आहे. यापुढे ऋतूचक्र बदलतच राहणार आहे. सहा ऋतू ठराविक काळात, ठराविक प्रमाणात येतील आणि आनंद देऊन जातील हा विचार आता मागे ठेवला पाहिजे. माणसाचा दिनक्रम बदलला, त्याने तो स्विकारला तसेच आता बदलते ऋतूचक्रही आपण स्विकारायला हवे. त्याच्या बदलत्या वेळापत्रकाची सवय करुन घेतली पाहिजे आणि महत्त्वाचे म्हणजे यातून चांगल्या पद्धतीने मार्ग कसा काढता येईल हे पाहिले पाहिजे. शेवटी निसर्गावर कोणाचीही सत्ता नाही. तो बदलणे आपल्या हातात नाहीच नाही. आपण केवळ त्यानुरुप स्वत:मध्ये बदल घडवून आणू शकतो. तेव्हा यंदाच्या दिवाळीमध्ये हा विचार करायला हवा. तरच दु:खाची काजळी काही अंशी तरी कमी होऊ शकेल.



खास बात

**शर्वरी जमेनिस, प्रसिद्ध नृत्यांगना**

सध्या सणांचे रुपही बदलत आहे. सार्वजनिक सणांबाबत तर काही बोलू नये, अशीच स्थिती आहे. दिवाळीही त्याला अपवाद नाही. लोक रस्त्यावर दंगा करतात. स्पिकरच्या भतीसमोर बेभान नाचतात. दिवाळीमध्ये फटाक्यांचा प्रचंड वापर होतो. आवाजाची पातळी ओलांडली जाते. या सगळ्यामुळे आपल्या पंचेंद्रियांवर अतिशय विपरित आणि घातक परिणाम होत असतो. तो माणसाला समजतही असतो. यामुळे माणसाच्या ग्रहणशक्तीवर मर्यादा येऊ लागल्या आहेत. मात्र कोणीही याकडे लक्ष देत नाही. कबहुना, ध्वनि प्रदुषणाकडे हव्या त्या गांभीर्याने पाहिलेही जात नाही. यासंबंधीची समज अत्यंत बाळबोध पातळीवर आहे. या दिवाळीत ती वाढवण्याचे काम झाले तर खूप काही हाती लागले असे म्हणावे लागेल.

सध्या सोशल मीडियाचा जमाना आहे. विषय, सादरीकरण, कथानक यावर कोणतेही बंधन नसलेल्या या व्यासपीठावर लोक आपली मनोरंजनाची भूक भागवू लागले आहेत. हवे ते सगळे खुलेआम बघू लागले आहेत. मात्र यातूनच आता सामान्य जीवनातील रक्तरंजितपणाही कमालीचा वाढला आहे. समाजात वावरताना तो अगदी सहजतेने बघायला मिळत आहे. एकदा याची सवय झाली की जाणीवा बोथट होत जातात. माणूस असंवेदनशील होतो. ही असंवेदनशीलता विविध प्रसंगांमधून आपल्यासमोर येत आहे. सणांच्या सादरीकरणाच्या बिभत्स रुपातूनही ती दिसते आहे.

यंदाची दिवाळी साजरी करताना, दीपावलीचे दिवे लावताना प्रत्येकाने हा विचारही करायला हवा. कधी तरी याची सुरूवात करणे गरजेचे आहे. एखाद्या महात्म्याची जयंती साजरी करताना आपण कोणती गाणी लावतो आहोत, त्यांच्या पुतळ्यासमोर कसे नाचतो आहोत याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. कोणी काही सांगू जाता, आमचा सण आहे; तो हवा तसा साजरा करु, तुम्ही अडवणारे कोण? असे उर्मटपणे किती काळ बोलणार याचाही विचार आता व्हायला हवा. कारण अशा वातावरणात, या संस्काररहित अवस्थेत कोणीही चांगल्या प्रकारे जगू शकत नाही. श्वास घेऊ शकत नाही. तेव्हा एकीकडे दिवाळीचे स्वागत करताना भेडसावणाऱ्या सामाजिक प्रश्नांचेही भान ठेवू या आणि अजून तरी पहाटे डीजे लागत नसल्याचा आनंद व्यक्त करत शास्त्रीय रागांच्या मैफिलींची मजा लुटत सण साजरा करु या.

✦✦✦

# आसामच्या आवाजाचा अनुत्तरीत मृत्यू

१९ सप्टेंबरच्या सकाळी गायक झुबीन गर्ग याचे सिंगापूरमध्ये निधन झाल्याची बातमी आली तेव्हा आसाममध्ये पहिली प्रतिक्रिया होती ती अविश्वासाची. ज्या गायकाचा आवाज त्यांच्या प्रेम कथांचा, प्रेमभंगाचा, उत्सवाचा, इतकंच नव्हे तर त्यांच्या दैनंदिन जीवनाचा होता; तो शांत झाला हे स्वीकारण्यास आसाममधील लोक तयारच नव्हते. आसाममध्ये पोहचलेली पहिली बातमी साधी होती. जुबीन गर्ग लाझारस बेटाजवळ स्कूबा डायव्हिंगला गेला होता, तो जखमी झाला होता, त्याला रुग्णालयात नेण्यात आले होते आणि तिथेच तो मरण पावला. हा धक्का बसताच चाहत्यांनी त्याच्या घरी आणि सार्वजनिक ठिकाणी, मंदीरांमध्ये, दुकानांवर गर्दी केली. सोशल मीडियावर, हजारो पोस्टमध्ये त्याचा चेहरा, त्याचा आवाज आणि त्याच्या गाण्यांच्या आळी होत्या. त्या सुरुवातीच्या काही तासांमध्ये लोकांना हा एक अपघात आहे, असे वाटले. पण लवकरच कथा बदलू लागली. झुबीनच्या मृत्यूनंतर वेगवेगळे अहवाल समोर आले आणि लवकरच सत्य अस्पष्ट वाटू लागले. हा खराखरच स्कूबा अपघात होता की यात आणखी काही रहस्य होते? त्याच्या शवविच्छेदनाबद्दल लपवल्या गेलेल्या तपशीलांमुळे अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागले. त्याच्या मृत्यूचे गूढ अनेक शंका निर्माण करु लागले. त्यानंतर झुबीनच्या एका बँडमेटने माध्यमांशी बोलताना झुबीनला विषबाधा झाल्याची शक्यता वर्तवली. अचानक दुःखद अपघात म्हणून सुरू झालेली कहाणी संभाव्य गुन्हा बनली. त्याच्या स्वतःच्या मॅनेजरला अटक करण्यात आली. यॉटवर त्याच्यासोबत असलेल्या इतर लोकांनाही ताब्यात घेण्यात आले. दररोज नवीन माहिती बाहेर येत होती, परंतु त्यात पुरेशी स्पष्टता नसल्याने अधिक गोंधळ निर्माण झाला. त्याच्यावर सर्वाधिक प्रेम करणाऱ्यांना प्रश्न पडला की त्या शेवटच्या तासांमध्ये खराखर काय घडले हे कधी कळेल का?

जनतेचे दुःख रागात बदलले. सुरुवातीला लोक त्याची गाणी गाण्यासाठी, मेणबत्त्या पेटवण्यासाठी, त्याला श्रद्धांजली वाहण्यासाठी जमले. पण लवकरच आसाममधील वातावरण अधिक तीव्र झाले. गर्दी रस्त्यावर उतरली. तपासात एका टेलिव्हिजन चॅनलच्या मालकाचे नाव समोर आल्यानंतर शेकडो लोकांनी त्याच्या कार्यालयाबाहेर निदर्शने केली. झुबीनचे कौतुक करणारे पोस्टर्स आणि घोषणा आता न्याय मागण्यासाठी वापरल्या जाऊ लागल्या. लोकांमध्ये अविश्वासाची लहर होती. तरुण पिढी या निदर्शनांच्या आघाडीवर होती. आसाममधील 'जेन झी'साठी झुबीन गर्ग हे त्यांच्या पालकांच्या काळातील केवळ एक गायक नव्हते तर ते त्यांच्या स्वतःच्या जीवनाचा एक भाग होते. ते युट्युबवर, फोनवर, स्ट्रीमिंग ॲप्सवर त्याचे संगीत ऐकत



मोठे झाले होते. त्यांच्यासाठी तो आवडता पॉपस्टार होता. म्हणून तो मरण पावला तेव्हा ते घरी शांत बसले नाहीत. त्यांनी निदर्शने केली, आवाज उठवला. सोशल मीडियावर त्याचे व्हिडिओ, गाणी स्वत:च्या जळजळीत पोस्टसह व्हायरल केले. त्यांनी हॅशटॅग ट्रेंड बनवला आणि लाईव्ह अपडेट्स शेअर केले. त्यांचे दुःख एक चळवळ बनली आणि त्यांच्या शोकाचे रुपांतर सत्याच्या मागणीत बदलले. सोशल मीडियावर जेन झीने वादळ उठवले आहेच, पण इतरही चाहत्यांनी झुबीनवर श्रद्धांजलींचा वर्षाव केला. आपल्या गाण्यांनी झुबीनने कठीण काळात कसे वाचवले याबद्दल चाहत्यांनी लिहिले.

१८ नोव्हेंबर १९७२ रोजी गुवाहाटी येथे जन्मलेला झुबीन संगीताच्या वातावरणातच वाढला. त्याचे वडील तबलावादक होते आणि आई गायिका होती. इतर मुलांनी अक्षरे शिकली, तशीच या लहान मुलाने राग, ताल आणि सूर सहज आत्मसात केले. तो किशोरावस्थेतच गाणी लिहू लागला होता आणि आसामी संगीत मोठ्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचे स्वप्न पाहत होता. १९९० च्या दशकात त्याने आसामी संगीतक्षेत्रात पाऊल ठेवले. 'माया' आणि 'पाखी'सारख्या गाण्यांनी त्याला आसाममध्ये रातोरात स्टार बनवले. त्याच्या संगीत मैफिली तरुण चाहत्यांनी भरलेल्या असत. त्यामध्ये त्यांना स्वतःच्या आकांक्षा प्रतिबिंबित करणारा आवाज ऐकायला मिळायचा. झुबीनने तब्बल ४० भाषांमध्ये गाणी गायली, ज्यामध्ये आसामीपासून बंगाली, नेपाळी, बिहू, भोजपूरी, तामिळ, उडिया, सिंधी, तेलगू या भाषांचा समावेश होता. आसामी, बंगाली, हिंदू, मुस्लिम, आदिवासी प्रत्येकाने त्याची गाणी गुणगुणली. तथापि, त्याचे नशीब आसामच्या सीमेत अडकू शकले नाही.

**झुबीन गर्गचा आवाज आसाममधून वाहणाऱ्या नदीसारखा होता. तो चहाच्या दुकानात, बसमधील गर्दीमध्ये, लग्नांमध्ये असा सर्वत्र ऐकू यायचा. आसामच्या भूमीतील हा गायक गेली तीन दशके फक्त गात नव्हता, तर समाज आणि राजकारणाबद्दल उघडपणे, तीव्रपणे बोलायचा. काहींनी त्याचे कौतुक केले, तर काहींनी टीका केली. पण कोणीही दुर्लक्ष केले नाही. म्हणूनच त्याच्या अचानक मृत्यूने लोकांना वीज पडल्यासारखा धक्का बसला.**

२००६ मध्ये झुबीनने 'गँगस्टर' या बॉलीवूड चित्रपटासाठी 'या अली' गायले. हे गाणे त्याच्या आयुष्यातील एक टर्निंग पॉईंट ठरले. मुंबईच्या रस्त्यांपासून कैरोच्या कॅफेपर्यंत, दिल्लीतील रेडिओ स्टेशनपासून दुबईतील नाईट क्लबपर्यंत 'या अली' सर्वत्र गाजत होते. गुवाहाटीचा हा मुलगा अचानक राष्ट्रीय दर्जाचा स्टार बनला. अनेक आसामी श्रोत्यांसाठी हे केवळ त्याचे यश नव्हते तर त्यांचा सामूहिक विजय होता. त्यांच्या स्वतःच्या भाषेला आणि संस्कृतीला जागतिक राजदूत मिळाला होता.

नोंद

**अश्विनी पारकर**

त्यानंतर झुबीनने अनेक बॉलीवूडपटांसाठी गाणे गायले, तरीही त्याने मातीशी नाते तोडले नाही. आसामी संगीताला तर त्याने समर्पित करुन घेतले होते. त्याने आसामी चित्रपटांना संगीत देणे, त्याच्या मातृभाषेत एकल अल्बम रिलीज करणे आणि तरुण संगीतकारांना प्रोत्साहन देणे सुरूच ठेवले. त्याने 'मिशन चायना' तसेच अनेक आसामी चित्रपटांमध्ये अभिनय केला आणि दिग्दर्शनही केले. त्यातील अनेक चित्रपट ब्लॉकबस्टर ठरले. तो अनेकदा म्हणायचा की, बॉलिवूडने त्याला प्रसिद्धी दिली, तर आसामी संगीताने ओळख दिली. झुबीनचे जीवन अनेक विरोधाभासांनी भरलेले होते. तो स्पष्टवक्ता होता, कधी कधी वादग्रस्त होता, अनेकदा तडजोड करण्यास तयार नव्हता. तो राजकारणावर टीका करत असे, सामाजिक समस्यांबद्दल बोलत असे परंपरेला, रुढींना आव्हान देत असे. यामुळे तो काहींसाठी बंडखोर बनला. तो आसाममधील जनतेसाठी एक असा नायक होता, जो निर्भयपणे सत्य बोलायचा. पूरग्रस्तांसाठी संगीत कार्यक्रम आयोजित करायचा, रुग्णालयांसाठी पैसे उभारायचा आणि विद्यार्थ्यांच्या निदर्शनांमध्ये सहभागी व्हायचा. त्याला केवळ मनोरंजन करणारा गायक बनायचे नव्हते, तर सामाजिक जाणीव असलेला एक जबाबदार नागरिक बनायचे होते.

झुबीनचा सिंगापूरमध्ये अचानक झालेला मृत्यू हे केवळ संगीतक्षेत्रातील नुकसान म्हणता येणार नाही, तर विवेकाचा आवाज शांत झाल्याची बोच देणारी हताशा आहे. अधिकृत अहवालात म्हटले आहे की तो लाजरस बेटाजवळ पोहताना बुडाला. तो आसामचे संगीत जागतिक स्तरावर नेण्याच्या उद्देशाने ईशान्य भारत महोत्सवासाठी सिंगापूरला गेला होता. साक्षीदारांनी सांगितले की त्याला पाण्यात श्वास घेण्यास त्रास होत होता. त्याला त्या क्षणी वाचवण्यात आले. सीपीआर देण्यात आला. परंतु तो वाचू शकला नाही. सिंगापूरच्या अधिकाऱ्यांनी त्याचा मृतदेह कुटुंबाला सोपवण्यापूर्वी शवविच्छेदन केले. परंतु त्याची पत्नी गरिमा गर्ग यांनी सार्वजनिकरित्या प्रश्न उपस्थित केला आहे की तो आजारी असताना त्याला पोहण्याची परवानगी का देण्यात आली? त्याच्या एका बँडमेटने तर विषबाधेची शक्यता वर्तवल्याने निष्काळजीपणापेक्षा त्याच्या मृत्यूभोवती घातपाताचे वलय निर्माण झाले. आसामच्या मुख्यमंत्र्यांनी न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले आहेत. त्याच्या मृत्यूप्रकरणी अनेक संशयितांना अटकही करण्यात आली आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. मात्र रोज येणारी नवी माहिती त्यांच्या कुटुंबासाठी आणि चाहत्यांसाठी नवी वेदना घेऊन येत आहे. आपल्या मुळांशी घट्ट असलेल्या नात्यामुळे, मातीशी असलेल्या निष्ठेमुळे झुबीनला लोकांच्या हृदयात कायमचे स्थान मिळाले. मात्र, त्याच्या अनुत्तरित अन गूढ मृत्यूने आसामवासीयांच्या मनात भळभळती जखम कायम राहिल.

✦✦✦

# तऱ्हेवाईक पाऊस, संकटात अर्थधोरणे

गेला काही काळ बाजारपेठेप्रमाणेच शेतीसाठीही चांगलाच अस्वस्थतेचा ठरला. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्या तऱ्हेवाईक वागण्यामुळे उद्योगक्षेत्रात आणि देशांच्या अर्थकारणामध्ये मोठे तरंग उमटत असताना देशात तितक्याच तऱ्हेवाईक पावसाने धुमाकूळ घातला. पाहता पाहता अनेक भागांमध्ये पाणी वाढत गेले आणि अनपेक्षितपणे शेती पाण्यात गेली. अनेक ठिकाणी तर वर्षानुवर्षे किरकोळ पावसाची नोंद होत असलेल्या भागांमध्येही नद्या वाहिल्या. अशा अनेक ठिकाणी पाहता पाहता पिके पाण्याखाली जाऊन कोलाहल माजला. याचा थेट परिणाम आत्ताच्या घडीला पहायला मिळाला नसला तरी येत्या काळात अनेक सामाजिक, आर्थिक प्रश्नांच्या रुपात पहायला मिळू शकतो. बरे, असा परिणाम एखाद दुसऱ्या ठिकाणीच दिसला असे नाही तर थोड्या फार फरकाने अनेक राज्यांमध्ये पहायला मिळाला. सतत निसर्गाचे फटके सहन करणाऱ्या उत्तराखंडसारख्या भागात हे पहायला मिळालेच, पण राजस्थानच्या वाळवंटी भागा–तही हा प्रकोप दिसला. कधी नव्हे तो पंजाबमध्ये प्रचंड पूर आला. जम्मू–काश्मिरमध्येही अनेक ठिकाणी पाण्याने पातळी ओलांडली. परिणामी, अनेक राज्ये हातघाईवर आली. त्या निमित्ताने राजकारण्यांचे, ज्येष्ठ–श्रेष्ठ नेत्यांचे पाय सामान्य बाधित शेतकऱ्यांच्या शेतजमिनीला लागले. अनेक प्रकारच्या आश्वासनांची देवघेव झाली. दरम्यान, अमेरिकेच्या वाढीव आयात शुल्कामुळे अनेक देशांच्या व्यापाराचे गणित बिघडू लागले. फक्त निर्यातभिमूख क्षेत्रांमध्येच नाही, तर अन्य क्षेत्रांमध्येही पडसाद उमटू लागले. उद्या घाईला येऊ शकणाऱ्या उद्योगचित्राचे जणू दर्शन घडू लागले.

देशातील गृहनिर्माण आणि बांधकामक्षेत्राचा विकास करण्यासाठी नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल अर्थात 'नरेडको'ची स्थापना करण्यात आली आहे. तिच्या महाराष्ट्र विभागाकडून 'होमथॉन प्रोपर्टी एक्सपो २०२५'चे आयोजन मुंबईत करण्यात आले होते. त्यावेळी एक लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक गृहनिर्माण प्रकल्पांचे अनावरण करण्यात आले. दिवाळीमध्ये देशभरात एक लाख ३५ हजार ते एक लाख ४० हजार घरे विकली जाऊ शकतात, असा अंदाज आहे. सध्या घरखरेदीच्या व्यवहारांमध्ये १५ ते २० टक्क्यांची वाढ दिसत असून प्रमुख शहरांमध्ये



येत्या तिमाहीमध्ये दुप्पट वाढ दिसत आहे. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने ही आश्वासक बाब आहे. दुसरीकडे, अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी औषधांवर शंभर टक्के आयात शुल्क लादण्याचा निर्णय घेतला असला, तरी भारताच्या दृष्टीने त्याचे परिणाम मर्यादित रा–हतील, असा विश्वास या क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केला. याचे कारण, त्यांचा आदेश हा केवळ स्वामित्व हक्क, म्हणजेच पेटंट आणि नाममुद्रित, म्हणजेच ब्रँडेड औषध उत्पादनांनाच लागू होणार आहे. भारतीय कंपन्यांकडून निर्यात होत असलेल्या जेनेरिक औषधांवर आयात शुल्काचा कोणताही परिणाम होणार नाही. डॉ. रेड्डीज लॅबोरेटरीज, सन फार्मा, ल्युपिन, झायडस लाइफ सायन्सेस यासह आघाडीच्या २३ भारतीय कंपन्या अमेरिकेत मुख्यतः जेनेरिक औषधांची निर्यात करतात. भारत हा दीर्घकाळापासून परवडणाऱ्या आणि उच्च गुणवत्तेच्या औषधांच्या जागतिक पुरवठा साखळीचा एक महत्त्वाचा घटक आहे. अमेरिकेच्या औषधांच्या गरजांपैकी ४७ टक्के पुरवठा भारतातून होतो.

या सर्व पार्श्वभूमीवर आर्थिक वर्ष २०२५–२६ मध्ये मजबूत देशांतर्गत मागणीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेची धाव कायम राहील, असा आशावाद एसअँडपी ग्लोबलने व्यक्त केला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेकडून पुढेही व्याजदरात माफक कपात केली जाण्याची शक्यता आहे. चालू आर्थिक वर्षासाठी भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा ६.५ टक्के राहणार असल्याचे 'एसअँडपी'चे अनुमान आहे. मुख्यतः हंगामी पाऊस मोठ्या प्रमाणात अनुकूल असल्याने देशांतर्गत मागणी वाढली आहे. परिणामी, चालू आर्थिक वर्षासाठी महागाई दराचा अंदाज ३.२ टक्क्यांपर्यंत कमी करणाऱ्या रिझर्व्ह बँकेकडून आगामी पतधोरण बैठकीत रेपो दरात २५ आधारबिंदूंची कपात केली जाईल, अशी अपेक्षा आहे. सरलेल्या एप्रिल–जून २०२५च्या तिमाहीमध्ये देशाचे सकल देशांतर्गत उत्पादन




अर्थात जीडीपीवाढीचा दर ७.८ टक्के होता. त्यामुळे ३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात विकासदर ६.५ टक्क्यांवर राहू शकेल. अनुकूल मान्सून, त्या परिणामी वाढलेले उत्पन्न, वस्तू आणि सेवा करात झालेली कपात आणि सरकारी गुंतवणुकीला मिळालेली गती यामुळे देशांतर्गत मागणी मजबूत राहील, असे दिसते. अन्नधान्याच्या महागाईत अपेक्षेपेक्षा जास्त घट झाल्यामुळे चालू वर्षात भाववाढ कमी राहण्यास मदत होईल. महागाई आटोक्यात असल्यामुळे रिझर्व बँकेला पतधरणाच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने रेप–ोदरात कपात करण्यास वाव आहे. परिणामी,

**अमेरिकेच्या वाढीव शुल्कामुळे निर्याताभिमूख क्षेत्रांमध्येच नाही, तर अन्य क्षेत्रांमध्येही पडसाद उमटत आहेत. देशातील शेतमालाचा पुरवठा कमी होणार असून अंदाजापेक्षा जास्त प्रमाणात महागाई वाढण्याची भीती आहे. हे लक्षात घेऊन केंद्र सरकारला राज्यांना मदत करताना वित्तीय धोरणांची फेरआखणी करावी लागेल. या घडामोडींच्या निमित्ताने 'आहे रे' आणि 'नाही रे' वर्गातील दरी वाढण्याची शक्यताही दिसून येत आहे.**

चालू आर्थिक वर्षात आणखी २५ आधारबिंदूंची कपात होण्याची अपेक्षा आहे. देशांतर्गत मागणी मजबूत असल्याने, अमेरिकेकडून आयातशुल्कात करण्यात आलेली वाढ आणि मंदावलेल्या जागतिक वाढीनंतरही बाय अडचणींचा परिणाम अत्यंत असेल, असे एकूण चित्र आहे.



परामर्श

**हेमंत देसाई,** ज्येष्ठ पत्रकार

मात्र गेल्या दोन महिन्यांमध्ये महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे तब्बल २७ लख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. एकूण १९५ तालुक्यांमधील शेतीपिके उद्ध्वस्त झाली आहेत. धाराशिव जिल्ह्यातील सव्वातीन लाख हेक्टरवरील पिके मातीमोल झाली आहेत. बीड, सोलापूर, परभणी वगैरे जिल्ह्यांमधील परिस्थितीदेखील बिकटच आहे. राज्यातील ३० जिल्ह्यांमधील शेती बाधित झाली आहे. सोयाबीनसारख्या पिकांची काढणी काही दिवसांमध्ये झाली असती. मात्र अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून नेला. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात सिंधपण्णा, डोंबरी आणि विद्रूपा नदीचा संगम शिरसमार्ग या गावात होतो. हे गाव महाराष्ट्रातील 'मोसंबी हब' म्हणून ओळखले जाते. तेथील तीन हजार एकरावरील मोसंबी पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून पाच हजार शेतकऱ्यांना २०० कोटी रुपयांचा फटका बसला आहे. येथील मोसंबी संपूर्ण देशात धाडली जातात. झाडावर फळे आली आणि सौदेही झाले. परंतु माल तोडायच्या आतच बागा उन्मळून पडल्या. पूर आणि पाण्यामुळे सगळीकडे चिखल झाला आणि पाहता पाहता शेकडो फळे गळून पडत चिखलात गेली. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग, भाजीपाला, भात, बाजरी, ज्वारी, कांदा, हळद आणि फळबागांचे नुकसान झाले आहे. नांदेड, बीड, सोलापूर, यवतमाळ आणि वाशिम हे सर्वाधिक नुकसान झालेले पाच जिल्हे आहेत.

तिकडे पंजाबमधील रावी, बियास आणि सतलज नद्यांना आलेल्या पुरात शेकडो लोक विस्थापित झाले आणि तीन लाख एकरपेक्षा जास्त पिकांचे नुकसान झाले. ४२ हजार हेक्टर जमिनीवरील भातपिके हातातून गेली. त्याचप्रमाणे गहू, ऊस, मका या पिकांचीही हानी झाली आहे. या नुकसानीमुळे पंजाबमध्ये हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करण्यात आली असून महाराष्ट्रातही तेवढ्याच मदतीची मागणी केली जात आहे. मात्र यातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, या सगळ्यामुळे देशातील धान्य वा अन्य शेतमालाचा पुरवठा कमी होणार असून अंदाजापेक्षा अधिक प्रमाणात महागाई वाढण्याची भीती आहे. हे लक्षात घेऊन केंद्र सरकारला राज्यांना मदत करताना आपल्या वित्तीय धोरणांची फेरआखणी करावी लागेल. जीएसटी कपातीने बाजाराची दिशा पालटल्याची वदंता ऐकायला मिळत आहे. बऱ्याच क्षेत्रांमध्ये नव्या जोमाने खरेदीयात्रा सुरु झाल्याचे सांगण्यात येत आहे. पण ताज्या घडामोडींच्या निमित्ताने 'आहे रे' आणि 'नाही रे' वर्गातील दरी वाढण्याची शक्यता दिसून येत आहे.

✦✦✦

# भारत–अफगाणिस्तान संबंध दृढ होणार

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने दहशतवादी पार्श्वभूमी लक्षात घेऊन तालिबानी नेत्यांवर विदेशप्रवासाला बंदी घातली होती. चार वर्षांनंतर हे निर्बंध प्रथमच उठवण्यात आले. त्यामुळे अफगाण तालिबान नेते इतर देशांमध्ये प्रवास करू शकतात. २०२१ मध्ये तालिबानने अफगाणिस्तान ताब्यात घेतल्यापासून तालिबान सरकारच्या एखाद्या मंत्र्याचा हा पहिलाच अधिकृत भारत दौरा असेल. भारताने अद्याप तालिबान सरकारला मान्यता दिलेली नाही; परंतु अलिकडच्या काळात दोन्ही देशांमधील संपर्क वाढला आहे. मे २०२५ मध्ये काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी तालिबान सरकारच्या परराष्ट्र मंत्र्यांशी फोनवरून चर्चा केली. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी जानेवारी २०२५ मध्ये मुत्ताकी यांची भेट घेतली होती. आता मुत्ताकी यांचा दौरा भारत आणि अफगाणिस्तानसाठी एक महत्त्वाचा राजनैतिक क्षण आहे. भारताने भूतकाळात अफगाण तालिबानला विरोध करणाऱ्या गटांना पाठिंबा दिला होता. तालिबानला पाकिस्तानचे हत्यार मानले जात होते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काबूलजवळील बगराम हवाई तळ घेण्याची घोषणा केल्यानंतर मुत्ताकी यांचा भारत दौरा होत आहे. मुत्ताकी यांचा दौरा सध्या महत्त्वाचा आहे, कारण अफगाणिस्तानमध्ये चीनचा प्रभाव वाढत आहे. रशियानेही तालिबानशी राजनैतिक संबंध वाढवले आहेत. पहलगाम हल्ल्याच्या वेळी भारताने अफगाणिस्तानवर हल्ला केला, असा कांगावा पाकिस्तानने केला; परंतु अफगाणिस्तानातील तालिबान सरकारने ते लगेच नाकारले.

पाकिस्तानी सरकारशी तालिबानची जवळीक होती; परंतु आता सीमावादामुळे तालिबान आणि पाकिस्तानमधील संबंध बिघडले आहेत. अशा वेळी मुत्ताकी यांचा भारत दौरा होत आहे. अफगाण आघाडीवर सध्या बरेच काही घडत आहे. हे या वस्तुस्थितीकडे निर्देश करते की तालिबान सत्तेत आल्यापासून भारताने त्यांच्याशी अतिशय सावधपणे ठेवलेल्या संबंधाचे हे परिणाम आहेत. २०२१ पर्यंत जगभरातील विविध देशांनी तालिबानशी संपर्क साधण्यास सुरुवात केली; परंतु भारताने तसे करण्यास उशीर केला. भारत पूर्वी तालिबानपासून अंतर ठेवत असे; परंतु आता तशी परिस्थिती नाही. तालिबान सत्तेत आल्यानंतर भारताने आपले राजनैतिक कर्मचारी मागे घेतले आणि थेट संपर्क थांबवला; परंतु नंतर भारताने लगेचच आपली रणनीती बदलली. तेव्हा भारताला जाणवले, की तालिबानपासून पूर्णपणे दूर राहणे अशक्य आहे. त्यानंतर भारताने पडद्यामागील चर्चा सुरू ठेवल्या. आपल्या भूभागाचा वापर भारतविरोधी कारवायांसाठी करू देणार नाही, हे आश्वासन भारताने त्यांच्याकडून मिळवले. तालिबानपासून पूर्ण अंतर राखण्याचे



धोरण व्यावहारिक नाही हे भारताला समजले आहे. तालिबान सरकारला मान्यता न देता मदत करणे आणि भागीदारीशिवाय तेथे उपस्थित राहणे भारताच्या तालिबानबद्दलच्या धोरणात संतुलन दर्शवते. जानेवारी २०२५ मध्ये विक्रम मिस्त्री यांनी मुत्ताकी यांची भेट घेतली, तेव्हा भारत तालिबान सरकारच्या जवळ जात असल्याचे संकेत मिळाले होते.

पहलगाम हल्ल्यानंतर मे २०२५ मध्ये दोन्ही परराष्ट्र मंत्र्यांनी फोनवर चर्चा केली. त्यातून एस. जयशंकर आणि मुत्ताकी यांच्यातील या संभाषणानंतर दोन्ही देशांनी जारी केलेल्या निवेदनांमध्ये त्यांच्या राष्ट्रीय प्राधान्यांचे प्रतिबिंब पडले. भारताने राष्ट्रीय सुरक्षेचा उल्लेख केला, कारण अफगाणिस्तान पुन्हा कधीही भारतविरोधी अतिरेकी गटांसाठी सुरक्षित आश्रयस्थान बनू नये अशी भारताची इच्छा आहे, तर अफगाणिस्तानने आंतरराष्ट्रीय मान्यता आणि गुंतवणूक मिळवण्यासाठी व्हिसा आणि व्यापाराची कारणे दिली. भारताचे अफगाणिस्तानमध्ये अनेक हितसंबंध आहेत, जे दुर्लक्षित केले जाऊ शकत नाहीत. विशेषतः तालिबानविरोधी गट विखुरलेले असतात आणि त्यांना जागतिक शक्तींकडून पाठिंबा मिळत नाही, तेव्हा परिस्थिती महत्वपूर्ण बनते. भारत अफगाणिस्तानमध्ये आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी तालिबान सरकारशी जवळीक वाढवत आहे. त्याच वेळी आपल्या माजी अफगाण मित्रांनाही वेगळे करत आहे. भारताला अफगाणिस्तानमधील मानवी हक्कांच्या परिस्थितीबद्दल चिंता आहे; परंतु असे असूनही तो तालिबानकडे दुर्लक्ष करू शकत नाही. भारताच्या प्रादेशिक सुरक्षेच्या चिंता अफगाण तालिबानशी संबंधित आहेत. यामध्ये पाकिस्तानी गुप्तचर संस्थांकडून तालिबान आणि इतर सशस्त्र गटांचा 'प्रॉक्सी' म्हणून वापर करण्याबद्दलची चिंता महत्वाची आहे. भारत अफगाणिस्तानमध्ये चीनचा प्रभाव कमी करण्यासाठी दीर्घकालीन गुंतवणूक पर्यायांवरही विचार करत आहे. भारताने मध्यम मार्ग स्वीकारला असून तालिबानला पाठिंबा देण्याचा प्रयत्न करत आहे. औपचारिक मान्यता न देता त्याने तालिबानशी मर्यादित परंतु अर्थपूर्ण संबंध सुनिश्चित केले आहेत.

हा दृष्टिकोन संवादाचे मार्ग खुले ठेवतो आणि अफगाणिस्तानला भारतविरोधी दहशतवादी गटांचे आश्रयस्थान बनण्यापासून रोखतो. तालिबानी परराष्ट्रमंत्र्यांच्या भेटीतून तालिबान पाकिस्तानची कठपुतली नाही,

**अफगाणिस्तानच्या तालिबान राजवटीचे परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्ताकी लवकरच भारत दौऱ्यावर येत आहेत. एके काळी अमेरिकेच्या जवळ असलेले अफगाणिस्तान आणि भारत आता अमेरिकेपासून दुरावत चालले आहेत. रशियाशी त्यांची मैत्री दृढ होत आहे. तालिबान राजवटीच्या काळातही अफगाणिस्तान आणि भारताचे संबंध चांगले राहिले असून, मुत्ताकी यांच्या दौऱ्यानिमित्ताने ते आणखी दृढ होणार आहेत.**

हे जगाला दाखवण्याचा प्रयत्न करत आहे. भारताची तालिबानशी जवळीक असल्याचे काही नकारात्मक पैलूदेखील आहेत. यामुळे अफगाण नागरिकांमध्ये पाकिस्तान आणि भारत दोघेही अफगाणिस्तानचा वापर युद्धभूमी म्हणून करत आहेत, अशी धारणा बळकट होऊ शकते. मुत्ताकी यांची भेट निःसंशयपणे संबंध वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असेल. २२ एप्रिल रोजी पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २२ पर्यटक ठार झाले. त्यामुळे भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला. भारत सरकारने दहशतवाद्यांविरोधात 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केले. भारतीय लष्कराने अनेक दहशतवाद्यांचा खात्मा केला. त्या वेळी जयशंकर यांनी मुत्ताकी यांच्याशी पहिल्यांदाच फोनवरून चर्चा केली. संभाषणादरम्यान, त्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की एके काळी तालिबानचा मित्र असलेला पाकिस्तान आता तालिबानसाठी तणावाचे कारण बनला आहे. त्यामुळे भारत–अफगाणिस्तानमध्ये त्यांच्या समर्थकांना एकत्रित करण्यासाठी तालिबानशी संवाद साधण्यास प्रवृत्त झाला आहे. भारताने तालिबानशी औपचारिक राजनैतिक संबंध प्रस्थापित केले नव्हते; परंतु तालिबानविरोधी गट, 'नॉर्दर्न अलायन्स'ला पाठिंबा दिला होता. १९९९ मध्ये इंडियन एअरलाइन्सच्या विमानाच्या अपहरणकर्त्यांशी वाटाघाटी करण्यात तालिबानने भारताला मदत केल्याने प्रवाशांचे सुरक्षित परतणे शक्य झाले.

मध्य आशियामध्ये लक्षणीय आर्थिक आणि ऊर्जा संसाधने आहेत. पाकिस्तान आणि चीनवरील अवलंबित्व टाळून चाबहार बंदरातून या संसाधनांपर्यंत जाण्यासाठी अफगाणिस्तान भारताला सोयीस्कर मार्ग प्रदान करतो. हे लक्षात घेण्यासारखे आहे, की भारताने अफगाणिस्तानमध्ये रस्ते, धरणे, शाळा, रुग्णालये आणि संसद भवन यासह विविध प्रकल्पांमध्ये तीन अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे. त्यामुळे अफगाणी जनतेचे जीवन सुधारू शकते आणि भारतीय आणि अफगाण दोघांनाही परस्पर फायदे मिळू शकतात. भारत आणि अफगाणिस्तानदरम्यान बरेच चांगले व्यापार संबंध आहेत. भारत अफगाणिस्तानमधून मोठ्या प्रमाणात विविध वस्तू खरेदी करतो. अफगाणिस्तानमधून फळे, मसाले, काजू आणि कांदे यासह विविध प्रकारच्या वस्तू अफगाणिस्तानमधून भारतात येतात. डाळिंब, सफरचंद, चेरी, कॅन्टलूप, टरबूज, हिंग, जिरे आणि केशरसारखे मसाले आणि मनुका, अक्रोड, बदाम, अंजीर, पाइन नट्स, पिस्ता आणि जर्दाळू यासारख्या वस्तूदेखील आयात होतात. २०२३ मध्ये अफगाणिस्तानमध्ये आलेल्या भूकंपाप्रसंगी भारताने भरीव मदत केली हे लक्षात घेण्यासारखे आहे.

विश्वभ्रमण

**प्रा. जयसिंग यादव**

त्यापूर्वी, कोविड–१९ साथीच्या काळात भारताने लसीकरणाचे योगदान दिले आणि मानवतावादी मदतही दिली. अशीच मदत देऊनही दहशतवादविरोधी मुद्द्यावर भारताला पाठिंबा देण्याऐवजी तुर्कस्तान पाकिस्तानचा समर्थक राहिला. या पार्श्वभूमीवर भारत आणि अफगाणिस्तानचे संबंध वाढवणे महत्त्वाचे होते. ते येत्या काळात घडेल, असे वाटते.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

✦✦✦

# मानसिक छळात रूपांतरित होणारे मानसिक खेळ

मानसशास्त्र आपल्याला विचार, भावना आणि वर्तन समजून घेण्यास मदत करते, ज्यामुळे आपला आत्मविश्वास वाढतो आणि आपल्या कमकुवतपणा ओळखण्याची आणि सुधारण्याची क्षमता वाढते. दुसऱ्या व्यक्तीच्या भावना आणि कृतींवर प्रभाव टाकण्यासाठी आणि नियंत्रित करण्यासाठी मनाचे खेळ नेहमीच खेळले जातात. जे एखाद्या व्यक्तीला काही गोष्टी करण्यास भाग पाडतात, कधीकधी नातेसंबंधांमध्ये फायदा मिळवण्यासाठी, आपला कमकुवतपणा उघड न करण्यासाठी, नातेसंबंधात वर्चस्व गाजवण्याची इच्छा असणे, एखाद्याला रस ठेवण्यासाठी, लक्ष वेधण्यासाठी किंवा फसवण्यासाठी मनाचे खेळ खेळले जातात, दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, मनाचे खेळ म्हणजे मानसिक हाताळणी. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या मानसिक खेळांमध्ये अनेकदा छुपे अजेंडे, हाताळणी, शक्तीचा वापर आणि इतर सूक्ष्म मानसिक युक्त्या असतात.

भावनिक बुद्धिमत्तेचा अभाव अनेकदा स्वार्थी आणि अदूरदर्शी वर्तनाकडे नेतो. जो व्यक्ती मनाचे खेळ खेळतो, जो नियंत्रित करतो, फसवतो किंवा मानसिक अत्याचारात गुंतला असतो, त्याला मॅनिपुलेटर किंवा नार्सिसिस्ट म्हणतात. मनाच्या खेळांचा आपल्या भावनिक आरोग्यावर खोलवर परिणाम होतो. हे काही प्रमाणात ठीक आहे, कारण त्यामुळे नातेसंबंधांमध्ये लवचिकता येते.

परंतु सतत असे मनाचे खेळ खेळणे मानसिक छळ ठरते. थेट आणि स्पष्ट संवाद अनेक मनाच्या खेळांना रोखू शकतो. हाताळणीच्या वर्तनावर चर्चा करताना, आपण काय पाहिले आहे आणि त्यामुळे आपल्याला कसे वाटते याबद्दल स्पष्ट असावे.

जागतिक मानसिक आरोग्य महासंघाने २०२५ च्या जागतिक मानसिक आरोग्य दिनाची थीम सेवांमध्ये प्रवेश - आपत्ती आणि आपत्कालीन परिस्थितीत मानसिक आरोग्य अशी जाहीर केली आहे. २०० हून अधिक प्रकारचे मानसिक आरोग्य विकार आहेत, ज्यात तणाव विकार, ऑब्सेसिव्ह-कंपल्सिव्ह डिसऑर्डर, सोशल फोबिया आणि सामान्यीकृत चिंता विकार, नैराश्य आणि बायपोलर डिसऑर्डर सारखे मूड डिसऑर्डर आणि इतर समाविष्ट आहेत.

आपल्या देशात मानसोपचारतज्ज्ञांची तीव्र कमतरता आहे आणि बहुतेक लोक, मानसिक विकार अनुभवत असतानाही, स्वतःला एक विकार असल्याचे ओळखत नाहीत. शरीराप्रमाणेच, मनाला दररोज व्यायामाची आवश्यकता असते; पोषक वातावरण आवश्यक आहे. आयुष्यात कधीही कोणाची अति सवय किंवा कुणावरही जास्त अवलंबून राहू नका, कारण त्या व्यक्तीच्या जाण्यानंतर किंवा त्यांच्या वर्तनात बदल झाल्यानंतर, आपण भावनिक विघटनाच्या उंबरठ्यावर पोहोचू शकतो.

भावनिक सुरक्षिततेचा अभाव, वर्चस्व किंवा नियंत्रणात असण्याची इच्छा, दुखापत होण्याची भीती किंवा स्वतःच्या असुरक्षिततेचे प्रतिबिंब यासारख्या कारणांमुळे महिला मानसिक खेळ खेळतात. हे डावपेच बचावात्मक असू शकतात किंवा पुरुषाच्या वचनबद्धतेची आणि आकर्षणाची चाचणी घेण्याचा प्रयत्न करू शकतात. काही महिला नकारात्मक भूतकाळातील अनुभवांपासून बचाव म्हणून मानसिक खेळांचा वापर करतात.

प्रेम आणि आकर्षण यांच्यातील फरक समजून घेणे महत्वाचे आहे, अन्यथा गैरसमज निर्माण होऊ शकतात आणि नातेसंबंध अनेकदा हिंसक बनू शकतात. कधीही रागाच्या भरात टोकाचे निर्णय घेऊ नका आणि आनंदात कधीही वचने किंवा शब्द देऊ नका, कारण निर्णय कधीही भावनांचा आहारी जाऊन घेऊ नयेत.

कोणत्याही नात्याचा पाया विश्वास आणि दोघांचीही भावनिक जवळीक असते. जेव्हा कधी यात अंतर उद्भवतो, तेव्हा नात्यांच्या ताकदीवर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

उदाहरणार्थ, समजा एक पुरूष आणि एक स्त्री चांगले मित्र आहेत, दोघांनाही एकमेकांबद्दल आदर आणि कामाचे कौतुक आहे. या परिस्थितीत, पुरूष मित्र हा चांगला आणि जबाबदार मित्र असतो, जो नेहमी आपल्या महिला मैत्रिणीच्या आनंदाचा, कर्तृत्वाचा विचार करतो. तथापि, महिला अधिक स्वार्थी असते आणि पुरुष मित्राचे विचार ऐकण्यात, समजून घेण्यात किंवा जाणून घेण्यात रस घेत नाही.



डॉ. प्रितम भी. गेडाम
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

महिला शक्य तितक्या पुरुषांचे लक्ष वेधून घेऊ इच्छिते, अनेक पुरुषांवर ती विनाकारण कौतुकाचा वर्षाव करत असते. सोशल मीडियावर, कामावर आणि इतरत्र तिचे असेच अनेक पुरुष मित्र असतात ज्यांच्याशी ती सारखीच वागते. याचा अर्थ असा की महिला मित्र प्रत्येक पुरुष मित्रासोबत एक मानसिक खेळ खेळण्याचा प्रयत्न करीत असते. अशी महिला अनेकदा रहस्ये, भ्रम किंवा फसवणुकीच्या दृष्टीकोनाने ग्रासलेली दिसते.

अशा परिस्थितीत, पुरुष मित्रांनी अशा महिलांपासून नेहमीच अंतर राखले पाहिजे. अन्यथा, पुरुष मित्र भावनिकदृष्ट्या गुंतू शकतात, अनुचित निर्णय घेऊ शकतात किंवा गैरवापराचा बळी पडू शकतात, ज्यामुळे गंभीर मानसिक आघात होऊ शकतो.

हे फक्त एक उदाहरण आहे, पण प्रत्यक्षात, मानसिक खेळ दररोज आपल्या विचारांवर परिणाम करते. काही लोक जवळीक दाखवतात, काही भावनिकदृष्ट्या धमकावतात किंवा आपल्या भावनांशी खेळतात, काही आपल्याला दोष देतात, काही आपल्याला दिशाभूल करतात, काही सत्य लपवतात आणि आपल्याला खोटेपणा दाखवतात.

लोकांच्या शब्दांना मनावर घेऊन आपण स्वतःला कमकुवत सिद्ध करू लागतो. यामुळे आपण सत्य आणि खोटे यांच्यात गोंधळून जातो आणि योग्य निर्णय घेण्यास असमर्थ होतो. बऱ्याच वेळा, सोशल मीडियावर पोस्ट पाहिल्यानंतर लोक आपला राग काढतात.

मुले मुलींची बनावट अकाउंट तयार करतात आणि बनावट आयडी वापरून ते चालवतात, जाणूनबुजून भडकाऊ पोस्ट करतात. दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, नेत्यांचे भाषण, अश्लील सामग्री, राजकीय आणि धार्मिक भावना भडकविणाऱ्या देखील वारंवार पोस्ट केल्या जातात, ज्यावर लोक प्रतिक्रिया देतात आणि मानसिक खेळाचा भाग बनतात.

एखाद्या व्यक्तीने मनावर खेळ खेळल्याची लक्षणे अशी असू शकतात. आपल्याला गोंधळलेले किंवा लाजिरवाणे वाटवणे, आपल्या स्वभावाच्या विपरीत वागविणे, जसे की अचानक शांत होणे किंवा खोल प्रेम दाखवणे, वर्तन लवकर बदलणे, गॅसलाइटिंग किंवा द्वेषपूर्ण प्रशंसा करून आपल्या धारणा हाताळणे, दुसऱ्यांवर दोषारोप ढकलून आपली जबाबदारी टाळणे, ते सतत त्यांचा मूड बदलतात, आणि नियंत्रण राखण्यासाठी माहिती लपवून किंवा त्यांच्या सामाजिक वर्तुळातून आपणास वगळून आपल्याला अंधारात ठेवतात.

स्वतःचा कमकुवतपणा लपवणे आणि थेट काहीही न मागता लक्ष वेधण्यासाठी मनाचे खेळ खेळणे. हे वर्तन सत्ता मिळविण्यासाठी किंवा त्यांना हव्या असलेल्या गोष्टी मिळवण्यासाठी हाताळणीचा एक प्रकार म्हणून काम करते, ज्यामुळे आपल्याला असुरक्षित वाटते किंवा स्वतःवर शंका येते.

मूक व्यवहाराव्यतिरिक्त, मानसिकदृष्ट्या, अनेक मनाचे खेळ आहेत जसे की अपराधीपणा, गॅसलाइटिंग, प्रक्षेपण, पीडितांची भूमिका निभावणे, लक्ष वेधण्यासाठी स्पर्धा, त्रिकोणीकरण, सूक्ष्म हाताळणी, जे टाळले पाहिजे. निरोगी नातेसंबंध आणि आपले मानसिक आरोग्य राखण्यासाठी या सामान्य मानसिक खेळांना ओळखणे आणि सामना करण्याच्या रणनीती विकसित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या करिता सीमा निश्चित करणे, उघडपणे संवाद साधणे आणि आपल्या स्वतःच्या गरजांना प्राधान्य देणे अत्यंत महत्त्वाचे आहे, तसेच लोक तुमची अत्यंत प्रशंसा का करतात आणि आपली हाताळणी का करतात याची जाणीव असणे देखील महत्त्वाचे आहे. चिथावणीला प्रतिसाद देऊ नका, असे करून, आपण आत्मविश्वासाने आणि शांततेने या मानसिक आव्हानांना तोंड देऊ शकतो.

एखाद्याच्या आनंदात आनंदी होणे आणि एखाद्याच्या दुःखात दुःखी होणे हे आता दिसत नाही, जेव्हाकी प्रत्यक्षात या मानवी भावना आहेत. आपण ढोंग आणि खोट्या वर्तनाचा मुखवटा घालून स्वतःची निरागसता संपवली आहे. म्हणूनच मानसिक विकारांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे, जे थेट शारीरिक आरोग्याला हानी पोहोचवत आहेत.

आयुष्य परिस्थितीनुसार तेवढे गुंतागुंतीचे नसते जितके मानव स्वतः बनवतात. नेहमी आपले मन हलके ठेवा आणि नकारात्मक विचारांचे ओझे वाहू नका. स्वतःची काळजी घेण्यास प्राधान्य द्या, नियमित शारीरिक हालचाली करा, संतुलित आहार घ्या आणि पुरेशी झोप घ्या. लोकांकडून जास्त अपेक्षा ठेवू नका. नातेसंबंध मजबूत करा, मित्र आणि कुटुंबासह वेळ घालवा. जे आपल्याला समजून घेतात, आपल्या भावनांना महत्त्व देतात आणि सुख-दुःखात आपल्याला साथ देतात अशा लोकांच्या संपर्कात रहा, जेणेकरून आपल्याला सकारात्मक ऊर्जा मिळत राहील आणि नकारात्मकतेपासून दूर राहता येईल.

## बहिणींच्या नावाखाली राजकीय रण!

लाडकी बहीण – नाव गोड, हेतू आकर्षक, पण यामागे राजकीय गणित मात्र तापलेलं आहे.

महाराष्ट्रात ही योजना सुरू होताच राज्यभरात महिलांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. तर मध्यप्रदेशात लाडली बहना या नावाने हाच प्रयोग यशस्वीपणे राबवला गेला. पण दोन्ही राज्यांतील धोरण, निधीची तजवीज आणि महिलांना मिळणाऱ्या प्रत्यक्ष लाभात मोठा फरक दिसून येतोय.

महाराष्ट्रात दरमहा १५०० रुपयांचा हप्ता देण्याचं आश्वासन देत सरकारने मोठा गाजावाजा केला. मात्र लाभार्थ्यांची पडताळणी, निधीची कमतरता आणि अन्य योजनांतून निधी वळवल्याच्या आरोपांमुळे योजना वादात अडकली. विशेष म्हणजे सामाजिक न्याय विभागाचा निधी वारंवार वळवल्याने विरोधकांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले आहे. सप्टेंबर महिन्याचा हप्ता देण्यासाठीच तब्बल ४१० कोटी रुपये सामाजिक न्याय विभागातून वळवावे लागले. त्यामुळे योजना लोकप्रिय पण निधी टंचाईत अशी स्थिती निर्माण झाली आहे.

दुसरीकडे, मध्यप्रदेशात तेव्हाचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी २०२३ मध्ये लाडली बहना योजना सुरू केली. राज्यातील २१ वर्षांवरील महिलांना दरमहा १२५० रुपये देण्याचा निर्णय झाला. अर्ज प्रक्रिया पारदर्शक ठेवत लाभार्थ्यांची पडताळणी ग्रामपातळीवर झाली. निधीही स्वतंत्र बजेटमधून मंजूर करण्यात आला. आज मध्यप्रदेशात तब्बल १.३ कोटी महिला लाभार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत आणि बहुतेकांना हप्ता नियमित मिळतोय. यामुळे भाजपने निवडणुकीत महिलांचा मोठा मतदार गट आपल्या बाजूला खेचला.



दिपक कैतके
मुंबई.

महाराष्ट्रात सध्या हप्त्यांच्या विलंबामुळे नाराजी वाढतेय, निधीची जुळवाजुळव सुरू आहे आणि विरोधक महिला मतांवरचा डाव असे म्हणत सरकारवर हल्लाबोल करत आहेत. मध्यप्रदेशात हीच योजना निवडणूक जिंकवून देते तर महाराष्ट्रात निधीअभावी संकटात सापडतेय. मूळ बातमी अशी की, सप्टेंबर महिन्याचा लाडकी बहीण हप्ता देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाचा ४१०.३० कोटी रुपयांचा निधी महिला व बालविकास विभागाकडे वळवण्यात आला आहे. या निधीवरून पुन्हा एकदा राजकीय आरोप-प्रत्यारोपांना तोंड फुटलं आहे. आता खरी कसोटी ठरणार आहे ती मध्यप्रदेशप्रमाणे ही योजना महाराष्ट्रातही स्थिर आणि विश्वासार्ह होते का, की फक्त राजकीय मोहरा ठरते?

■ ■ ■

## जनसुराज पक्ष चमकदार कामगिरी करू शकेल?

### बिहार विधानसभा निवडणूक

राहूल गोखले

बिहार विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी अखेरीस सुरु झाली आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) व महागठबंधन यांच्यातच मुख्य लढत होणार आहे हे उघड आहे. तूर्तास या दोन्हीपैकी कोणत्या आघाडीचे पारडे जड आहे हे ठरविणे अवघड आहे.

याचे एक कारण म्हणजे दोन्ही आघाड्यांमधील छोट्या मित्रपक्षांमध्ये असणारी खदखद आणि जागावाटपात जास्तीत जास्त जागा पदरात पाडून घेण्याची महत्वाकांक्षा. हे मित्रपक्ष नाराज झाले आणि त्यांनी स्वतंत्र चूल मांडली तर सर्वच पक्षांची समीकरणे बिघडतात याचा अनुभव २०२० च्या बिहार विधानसभा निवडणुकांनी दिला होता.

त्यावेळी एनडीएने जिंकलेल्या जागांची संख्या १२५ होती; तर महागठबंधनने ११० जागांवर विजय मिळवला होता. जिंकलेल्या जागांमध्ये पंधराचे अंतर असले तरी दोन्ही आघाड्यांनी मिळवलेल्या मतांमध्ये मात्र फारशी तफावत नव्हती. एनडीए व महागठबंधनने मिळवलेल्या मतांचे प्रमाण अनुक्रमे ३७.२६% व ३७. २३% इतके होते. तेंव्हा एनडीए व महागठबंधनमध्ये तुल्यबळ लढत झाली होती असेच म्हटले पाहिजे.

महागठबंधन सत्तेपासून वंचित राहिली असली तरी त्यास प्रमुख कारण म्हणजे काँग्रेसची निराशाजनक कामगिरी; आणि एआयएमआयएम पक्षाने विशेषतः सीमांचल भागात मुस्लिम मतदारांची खेचलेली मते. परिणामतः राष्ट्रीय जनता दलाने (राजद) ७५ जागा जिंकूनही (भाजपने ७४ जागा जिंकल्या होत्या) महागठबंधनला सत्ता मिळाली नव्हती.

त्याचवेळी चिराग पासवान यांच्या नेतृत्वातील लोकजनशक्ती पक्षाने एनडीचा घटक पक्ष म्हणून निवडणूक न लढविता स्वतंत्र चूल मांडली होती. त्या पक्षाने मुख्यतः नितीश कुमार यांच्या संयुक्त जनता दलाच्या (जेडीयू) उमेदवारांच्या विरोधात उमेदवार उतरविले होते. जेडीयूला त्याचा मोठा दणका बसला आणि त्या पक्षाला अवघ्या ४३ जागा जिंकता आल्या होत्या.

भाजपने जिंकलेल्या जागांच्या तुलनेत हे प्रमाण जवळपास निम्मे होते; मात्र तरीही भाजपने नितीश कुमार यांनाच मुख्यमंत्रीपद देणे पसंत केले. बहुधा नितीश कुमार यांची राजकीय कोलांटउड्या मारण्याची वृत्ती पाहून भाजपने तो निर्णय घेतला असावा. तरीही २०२२ मध्ये नितीश यांनी एनडीएची साथ सोडत राजदशी घरोबा केला होता हा भाग अलाहिदा. २०२४ मध्ये नितीश पुन्हा एनडीएमध्ये परतले.

आगामी विधानसभा निवडणुकीत राजदला सत्ताप्राप्तीची आस आहे. याचे एक कारण म्हणजे गेल्या निवडणुकीत थोडक्यात हुकलेली संधी. त्यामुळे यंदा ती कसर भरून निघेल अशी राजदला आशा आहे.

दुसरीकडे नितीश कुमार सरकारची गेल्या पाच वर्षातील घसरलेली कामगिरी हेही एक कारण आहे. सुशासन बाबू अशी नितीश यांची प्रतिमा होती. तथापि गेल्या काही काळात त्या प्रतिमेस तडा गेला आहे.

केंद्रातील भाजपप्रणीत सरकारला जेडीयू आणि तेलगू देशम या दोन पक्षांचा टेकू आहे. तेंव्हा नितीश यांना नाराज करणे भाजपला तूर्तास परवडणारे नसल्याने कदाचित मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करणे भाजप टाळू शकतो.

महागठबंधनने अद्याप मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर केलेला नसला तरी तेजस्वी यादव हाच तो चेहरा असेल हे मतदारांनी गृहीतच धरलेले आहे. तेंव्हा एकीकडे मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्याविषयी संभ्रम आणि दुसरीकडे स्पष्टता असे चित्र सध्या तरी आहे.

अशावेळी मतदारांचा कल राजदकडे असू शकतो असा त्या पक्षाचा होरा असू शकतो. तथापि राजदच्या या अपेक्षापूर्तीमध्ये दोन पक्ष अडथळा ठरू शकतात.

एक म्हणजे एआयएमआयएम आणि दुसरा म्हणजे पूर्वाश्रमीचे निवडणूक व्यूहरचनाकार प्रशांत किशोर यांचा जनसुराज पक्ष. साहजिकच या दोन पक्षांनी स्वतः जागा जिंकल्या नाहीत तरी राजदच्या हिशेबांना ते पक्ष धक्का देऊ शकतात.

अर्थात केवळ मतविभागणीला कारणीभूत ठरायचे की स्वतः जागाही जिंकण्यावर भर द्यायचा हे प्रशांत किशोर यांना ठरवावे लागेल. त्या पक्षाची ही खऱ्या अर्थाने पहिलीच निवडणूक होय.

अन्य पक्षांचे निवडणूक व्यूहरचनाकार म्हणून यश मिळाल्यानंतर स्वतः स्थापन केलेल्या पक्षाला मात्र यशाने हुलकावणी दिली तर प्रशांत किशोर यांचा पक्षाचे भवितव्य डळमळीत होईलच; पण स्वतः किशोर यांचे राजकीय भवितव्य देखील अडचणीत येईल.

याचा अर्थ त्या पक्षाने सत्तेची आस ठेवावी असा नाही. मात्र किमान दहा-पंधरा जागा जिंकण्याचे तरी लक्ष्य त्या पक्षाने ठेवणे गरजेचे. तसे झाले तर त्या पक्षाला बिहारच्या राजकारणात काही स्थान राहील. अर्थात हे लक्ष्य गाठणे देखील वाटते तितके सोपे नाही. जनसुराज पक्षाने आजवर निवडणुकीच्या राजकारणात केलेली कामगिरी फारशी उत्साहवर्धक नाही. किशोर यांनी मेहनत घेतली आहे हे खरे; पण मेहनतीची परिणती जनाधार मिळण्यात होईलच याची शाश्वती नसते.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेपासून अनेक पक्षांची कामगिरी याचा प्रत्यय देईल. नव्या पक्षाविषयी मतदारांमध्ये उत्सुकता अवश्य असते; परंतु म्हणून ते त्या पक्षाला मते देतातच असे नाही हा सार्वत्रिक अनुभव आहे. जनसुराज पक्षाला देखील हा अनुभव याअगोदर आला आहेच.

गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात बिहार विधानसभेच्या झालेल्या पोटनिवडणुकीत चारही जागांवर जनसुराज पक्षाने उमेदवार दिले होते. त्यांत निवृत्त लेफ्टनंट जनरल श्रीकृष्ण सिंह यांचाही समावेश होता. परंतु बिहारमध्ये त्यांची मतदार नोंदणी नसल्याचे उघड झाल्यावर त्यांची उमेदवारी मागे घेण्यात आली. अन्यही एका जागेवर उमेदवार बदलावा लागला. चारपैकी एकही जागा जनसुराज पक्षाला जिंकता आली नाहीच; पण तीन जागांवर उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली.

या पार्श्वभूमीवर किशोर यांनी आता तरुणांच्या समस्यांचे मुद्दे उपस्थित करण्यावर भर दिला आहे. कारभार, बेरोजगारी, स्थलांतर असे मुद्दे उपस्थित करून किशोर हे बिहारमधील सुमारे १४ लाख प्रथम-मतदारांना आकृष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

गेल्या विधानसभा निवडणुकीत महागठबंधन व एनडीए यांना मिळून सुमारे ७५ टक्के मते मिळाली होती. याचाच अर्थ या दोन्ही आघाड्यांना न मिळालेल्या मतांचे प्रमाण २५ टक्के होते. किशोर त्या वगार्ला आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करू शकतात. प्रश्न या सगळ्यातून किशोर कुठवर मजल मारू शकतात हा आहे.

एनडीए व महागठबंधन या दोन्ही आघाड्यांना बहुमतापेक्षा काही जागा कमी मिळाल्या आणि जनसुराज पक्षाला काही जागा जिंकता आल्या तर कदाचित किंगमेकर म्हणूनही किशोर यांचा भाव वधारू शकतो. तथापि तसे केल्यास आपण या दोन्ही आघाड्यांपासून अंतर राखल्याच्या आणि पर्यायी राजकारण करीत असल्याच्या दाव्यांना छेद द्यावा लागेल. एका अर्थाने बिहारची निवडणुकोत्तर समीकरणे बदलू शकतात.

प्रशांत किशोर यांनी बिहारच्या राजकारणाला निराळी दिशा देण्याच्या उद्देशाने सक्रिय राजकारणात उडी तर घेतली आहे. त्या महत्वाकांक्षेच्या पहिल्या कसोटीचे घोडामैदान आता फार दूर नाही!

---

**(लेखक राजकीय-आंतरराष्ट्रीय विषयांचे स्तंभलेखक आहेत)**

■ ■ ■

## कोजागिरी

मूळ संस्कृत शब्द को जागर्तिचे मराठी स्वरूप म्हणजेच कोजागिरी पौर्णिमा. याचा अर्थ कोण जागा आहे? म्हणजेच कोण जागृत आहे असा होतो. मग हे जागे असणे म्हणजे रोजची रात्र निद्रा टाळून फक्त शारीरिक डोळे टक्क उघडे ठेवणे असा घेतला गेलेला दिसतोय मला!



डॉ. अविनाश प. परांजपे
वानाडोंगरी, हिंगणारोड,
नागपूर.

**स्वसंवाद!**

या पौर्णिमेला रात्री साक्षात शिव पार्वती आकाशी प्रवास करून कोण जागा आहे हे बघतात म्हणे! पण ईश्वराला अपेक्षित असलेली जागृत अवस्था किंवा जागे असलेली व्यक्ती म्हणजे काही शारीरिक डोळे न मिटता दूध पीत बसलेली व्यक्ती असा असणारच नाही. मग तर कायम रात्रपाळी कर्मचारी सर्वात पुण्यवान मानावे लागतील.

खरच! मी जागा म्हणजेच जागृत आहे का? एक व्यक्ती म्हणून मी स्वतः खरच जागृत आहे? सुरवात स्वतः पासून केल्यास, मी रोज सूर्योदयापूर्वी झोपेतून उठतो का? उत्तर- नाही. मी रोज सकाळी प्रातर्विधी नंतर नियमित व्यायाम करतो का? उत्तर- नाही.

मी रोज शुद्ध सात्विक भोजन करतो का ? उत्तर - नाही. मी दिवसभर सिगारेटी, तंबाखू, खर्रा, घुटका शिवाय राहू शकतो का? उत्तर-नाही. मी दर आठवड्याच्या सुटीचे दिवशी मद्यसेवन टाळतो का? उत्तर नाही. मी दिवसातून एक दोन वेळा बाहेर होटेलातील समोसा, कचोरी, भजी, पिज्झा, बर्गर खाल्ल्याशिवाय राहू शकतो का? उत्तर नाही.

मी नियमित संध्याकाळी घरी परतून संध्यावंदन करतो का? उत्तर नाही. मी रात्री हलके सात्विक भोजन करतो का? उत्तर नाही. मी रात्री ठीक नऊ वाजता किवा त्यापूर्वी निद्रिस्त होतो का? उत्तर नाही. मग मी स्वतः च्या शरीरस्वास्थ्या बद्दल जागृत नाही, प्रकृती बद्दल जागृत नाही, तर एक व्यक्ती म्हणून कुटुंबात, समाजात, गावात, देशात जागृत असुशकेन का? उत्तर नाही हेच येते. कुटुंबात एक पुत्र/ कन्या म्हणून, पिता/ माता म्हणून, भाऊ / भगिनी म्हणून माझी कर्तव्यापोटी जागृती किती आहे? उत्तर शून्य ते ४०/५० टक्के. समाजात मी एक प्रामाणिक विद्यार्थी / कर्मचारी/ व्यापारी /उद्योजक /व्यावसायिक म्हणून ओळखला जावा या बाबत माझी जागृती किती आहे? उत्तर जवळपास नकारात्मकच येते.

गावात माझी प्रतिष्ठा पैशांवर नसून वागणूक व आचारावर असावी अशी जागृती आहे का? उत्तर नगण्य. मी या देशाचा देशभक्त, प्रामाणिक करदाता, असावा अशी जागरूकता माज्यात आहे का? उत्तर सांगायला लाज वाटते.

मी स्वतःला जागृत व जागरूक नागरीक तेव्हाच समजतो जेव्हा मला माझा किंवा माझ्या माणसांचा स्वार्थ दिसतो, आणि त्या स्वार्थाच्या मार्गात अडथळा आला की मी अन्याय, अन्याय म्हणून कण्ठ्षोश करीत असतो.

मला माझा अधिकार कळताना, फायदा समजताना मी जागृत असतो. पण माझे कर्तव्य म्हटले की मी त्या बाबतीत अज्ञानी व निद्रिस्थ असतो. मला माझे काम काय नाहीये हे बरोबर माहिती असते, कारण मी जागृत असतो . पण माझे काम काय आहे या बद्दल मात्र मी बेफिकीर असतो.

मला आवडतील अशी आश्वासने देणाऱ्या, मतदानाचे दिवशी मटन आणि बाटली देणाऱ्या माझ्या जातीच्या/ भाषेच्या/धर्माच्या नेत्यालाच मतदान करायला मी जागृत असतो. भले नंतर तोच नेता भ्रष्टाचार करत माझ्यासकट समाजाला, देशाला लुटों .

अश्या माझ्या सारख्या बव्हंशी जनतेला खरे जागृत करणे आवश्यक आहे असे जाणून आपल्या पूर्वजांनी ह्या सणाद्वारे जागे व्हा, जागे रहा.... हा संदेश देण्याची प्रथा सुरू केली असावी.

पण कैक शतके उलटून गेली. आपल्यावर असंख्य आक्रमणे झालीत, परकीयननी आपल्याला गुलाम बनविले. तरीही आपण एक भारतीय समाज म्हणून अजूनही निद्रिस्तच आहोत. आपल्या पाल्याच्या डोक्यात ज्ञान शिरो न शीरो, त्याला फक्त येसफेस इंग्रजी बोलता आले म्हणजे तो हुशार झाला, याच समजुतीने पालक त्यांच्या क्षमतेबाहेर शाळांची फी भरून त्याला इंग्लिश मिडियम मध्ये टाकतात.

पण रशिया,फ्रांस, जर्मनी, जपान, चीन आणि कित्येक देश त्यांच्या त्यांच्या मातृभाषेत शिकून इंग्लिश न शिकताच तंत्रज्ञानात कसे काय पुढारले? हा विचार ही डोक्याला शिवत नाही.

आपले डोके न वापरता, दुसऱ्याशी तुलना करत त्यांची नक्कल करीत राहणे,आणि जमले नाही की त्यावर टीका करणे एव्हढेच केले म्हणजे आपण जागृत झालो असे म्हणावे का? कधी कसे आणि केव्हा जागृत होणार आहोत आम्ही?

■ ■ ■

# तर विकसित भारत कसा बनेल?

> आपल्याला कोणतीही शिडी टप्प्याटप्प्याने चढून जावे लागते. पण भारत अनेकदा थेट वर पोहोचण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसते. मुलांसाठी दिले जाणारे भोजन निश्चित करण्याऐवजी आम्ही अंगणवाड्यांमध्ये चेहरा ओळखण्याचे तंत्रज्ञान बसवत आहोत!

गेल्या महिन्यात मी हरियाणाच्या नूंह जिल्ह्यात एका मित्रासोबत एक दिवस घालवला. दिल्ली ते नूह हा मार्ग गुरुग्राममधून जातो. तेथे तुम्हाला गुळगुळीत महामार्ग, मोठे मॉल आणि आलिशान रिसॉर्ट्स दिसतात. असे वाटते की तुम्ही दुबई किंवा शांघायमध्ये आहात.

नूह फक्त ५० किलोमीटर पुढे आहे. तिथले दृश्य बिहार किंवा उत्तर प्रदेशातील वंचित भागासारखे दिसते. सर्वत्र रिकामी शेते दिसतात. काही मुले पाण्याखाली असलेल्या शेतात मासेमारी करत आहेत. शांत म्हशी फिरत आहेत. गावे देखील शांत आहेत.

आम्ही नूंहपासून सुमारे पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या एका गावात थांबलो. प्राथमिक शाळेत १८९ मुले आहेत. पण फक्त एकच शिक्षक आहे. तो त्याच्या ऑफिसमध्ये असहाय्यपणे बसला होता. मुले गणवेश न घालता फिरत होती. अजिबात शिस्त नव्हती. शिक्षण ह एक दूरचे स्वप्न होते. त्याच परिसरात एक अंगणवाडी केंद्र होते. अंगणवाडी सेविका आयेशा सक्रिय दिसत होती. पण तिची परिस्थिती शाळेतील शिक्षिकेपेक्षा चांगली नव्हती. इंधन न मिळाल्यामुळे परिसरातील अंगणवाड्यांमध्ये अनेक महिन्यांपासून मध्यान्ह भोजन शिजवले जात नाही.

पूर्वी, आयेशा शाळेच्या मध्यान्ह भोजनातून मुलांना काही अन्न पुरवत असे. परंतु आता ती तेही करू शकत नाही. कारण तिला ई-केवायसीवर लक्ष केंद्रित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कारण सरकार घरी घेऊन जाणाऱ्या रेशनच्या वितरणात चेहऱ्याची ओळख वापरु इच्छिते. म्हणून आयेशा तिचा सर्व वेळ ई-केवायसीवर घालवते.

ई-केवायसी ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. ती पोषण ॲपमध्ये आईचा आधार क्रमांक प्रविष्ट करण्यापासून सुरू होते. त्यानंतर त्या आधार क्रमांकाशी जोडलेल्या मोबाइल नंबरवर एक ओटीपी पाठवला जातो.

अंगणवाडी सेविकेने पोषण ॲपमध्ये आईच्या नवीन फोटोसह हा ओटीपी प्रविष्ट केला पाहिजे. त्यानंतर ॲप आधार डेटाबेसमधील आईच्या फोटोशी हा फोटो जुळवतो. जर दोन्ही फोटो जुळले तर ई-केवायसी पूर्ण होते. आयेशाला या प्रक्रियेत अनेक अडचणी येतात. उदाहरणार्थ- काही महिलांचे आधार त्यांच्या फोटो नंबरशी जोडलेले नसते. कधीकधी आईचा आधार तिच्या पतीच्या मोबाईल फोनशी जोडलेला असतो आणि जेव्हा फोनवरून ओटीपी मागितला जातो तेव्हा पती घाबरतो.

कधीकधी ॲप हँग होतो किंवा एरर मेसेज दाखवतो. तो आयेशाला समजत नाही. कधीकधी फोटो जुळत नाहीत. वारंवार प्रयत्न केल्याने ई-केवायसी प्रक्रियेला बराच वेळ लागतो. त्यामुळे काही माता रागावतात किंवा त्यांना संशय येऊ लागतो.

आयेशा गेल्या दोन महिन्यांपासून यावर काम करत आहे. अंगणवाडी ठप्प आहे. आम्ही दुसऱ्या गावात दुसऱ्या अंगणवाडीला भेट दिली. आशा होती की तिथली परिस्थिती सुधारेल. कनेक्टिव्हिटीच्या समस्यांमुळे तिथली परिस्थिती आणखी वाईट झाली. आठवड्यांच्या कठोर परिश्रमानंतर अंगणवाडी सेविका १५० पैकी फक्त २८ मातांसाठी ई-केवायसी पूर्ण करू शकली. ती इतकी तणावग्रस्त होती की तिला रात्री ई-केवायसीबद्दल वाईट स्वप्ने पडायची. अलिकडच्या वर्षांत अंगणवाडी कार्यक्रम केवळ नुंहमध्येच कमकुवत झाला नाही. केंद्रीय अर्थसंकल्पात या कार्यक्रमासाठीची तरतूद प्रत्यक्षात दहा वर्षांपूर्वीपेक्षा कमी आहे.

गेल्या काही वर्षांपासून बाल पोषणासाठीच्या खर्चाच्या मानकांमध्ये फक्त एका ॲपवर दुसरे ॲप आणले जाते. पण प्रश्न असा की, मुलांकडे दुर्लक्ष केले तर भारत कसा विकसित होईल?

एक-एक पायरी चढून जावे लागते. पण भारत अनेकदा शिडी गाठण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसते. मुलांसाठी शिजवलेले जेवण सुनिश्चित करण्याऐवजी आपण अंगणवाड्यांमध्ये चेहरा ओळखण्याचे तंत्रज्ञान बसवत आहोत.

कदाचित मध्यान्ह भोजनात दररोज एक अंडे समाविष्ट करणे ही एक चांगली कल्पना असेल. अर्थात यामुळे हाय-टेक कंपन्यांचा नफा वाढणार नाही. यापैकी काही कंपन्यांची कार्यालये त्याच महालांमध्ये आहेत. परतताना गुरुग्राममध्ये पुन्हा ते महाल दिसले होते. ते पायरीच्या वरच्या भागात आनंदी आहेत. पण शिडीचा तळ कमकुवत असेल तर ती टिकेल का?

---

**ज्यां द्रेज**
**(हे विदेशी लेखक आहेत )**

■ ■ ■

# ग्लॅम वर्ल्ड



## प्राजक्ताला व्हायचे होते शिक्षिका...

प्राजक्ता माळी म्हणजे मराठी मनोरंजन क्षेत्रातील खेळकर, हसतमुख आणि गुणी अभिनेत्री. २०१३ मध्ये प्राजक्ताला झी मराठीच्या 'जुळून येती रेशीमगाठी' या मालिकेत प्रमुख भूमिका करण्याची संधी मिळाली. त्यानंतर तिने कधी मागे वळून पाहिलेच नाही. खो खो, हंपी, काशिनाथ घाणेकर, पार्टी या चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या प्राजक्ताच्या ग्लॅमरस लूकमुळे चाहत्यांची संख्या वाढतच गेली. लोकांना खळखळून हसायला भाग पाडणारा 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा शो 'सोनी मराठी' या वाहिनीवर प्रदर्शित होतो. प्राजक्ता या हास्यजत्रेची सूत्रसंचालिका बनली आणि पाहता पाहता महाराष्ट्रातल्या घराघरात जाऊन पोचली. अलिकडेच 'एम एच जे अनप्लग्ड' या पॉडकास्टमध्ये प्राजक्ताने मनसोक्त गप्पा मारल्या. त्यात तिने आपल्याला अभिनेत्री नव्हे, तर शिक्षिका व्हायचे होते असे सांगितले! विशेष म्हणजे नुकतीच तिने पुण्यातील येरवडा कारागृहातील महिला पुनर्वसन विभागाला भेट दिली आणि तिथला व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला. तिने आपण आध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर यांच्या शिकवणीचे पालन करण्याचा प्रयत्न केल्याचे या पोस्टमधून सांगितले.





## दीपिकाला हवी आठ तासांची शिफ्ट

आपली चिमुकली कन्या 'दुआ'साठी पुरेसा वेळ देता यावा म्हणून अभिनेत्री दीपिका पदुकोणने आठ तासांच्या शिफ्टची मागणी केल्यानंतर इंडस्ट्रीतून विविध प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. दीपिकाला 'कल्की २'मधून काढून टाकल्याच्या बातम्याही येत आहेत. दिग्दर्शक संदीप वांगा यांच्याशी या विषयावरून वाद झाल्याने 'स्पिरीट' या चित्रपटातूनही ती बाहेर पडली असल्याचे म्हटले जात आहे. आधी कोरिओग्राफर फराह खानने त्यावरून टिप्पणी केली होती. त्यामुळे दीपिकासोबत तिचे वाद सुरू झाल्याचे बोलले जाऊ लागले होते. नुकताच फराह खानने त्यावर पडदा टाकला. अभिनेत्री राणी मुखर्जीनेही या मागणीवर आपले मत मांडले. इंडस्ट्रीतल्या काहीजणांनी दीपिकाच्या आठ तासांच्या शिफ्टच्या मागणीचे समर्थन केले आहे. काहींनी त्यावर टीका केली आहे. आठ तासांच्या शिफ्टच्या मागणीबद्दल राणी मुखर्जी म्हणाली, 'हल्ली लोक याबद्दल उघडपणे बोलत आहेत म्हणून त्याची इतकी चर्चा होत आहे. परंतु हे सगळ्याच कामाच्या ठिकाणी होते. हा फक्त अभिनयक्षेत्रातील हा प्रश्न नाही. निर्मात्यांना काही समस्या नसेल, तर तुम्ही काही तासांमध्ये शूटिंग पूर्ण करून निघू शकता. परंतु निर्मात्यांना पटत नसेल तर तुम्हाला चित्रपटाच्या बाहेर काढले जाते. त्यामुळे लक्षात ठेवा, की कोणीही तुमच्यावर काहीही थोपत नाहीये. 'हिचकी'च्या वेळी राणी मुखर्जीची मुलगी फक्त चौदा महिन्यांची होती आणि निर्मात्यांच्या सहकार्यामुळे ती तो चित्रपट पूर्ण शकली.

## आजचे पालकत्व फार कठीण

अभिनेत्री मृण्मयी देशपांडे सध्या 'मनाचे श्लोक' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, या चित्रपटाचे दिग्दर्शन स्वतः मृण्मयी देशपांडेने केले आहे. सध्या मृण्मयी महाबळेश्वरला नवऱ्यासोबत शेती करण्याचा आनंद घेते आहे. 'वायफळ' या पॉडकास्टवर बोलताना मृण्मयीने आजच्या काळात मुलांना वाढवणे किती कठीण झाले आहे आणि एकत्र कुटुंब पद्धतीची किती आठवण येते, या विषयावर थेट मत मांडले. मुलाखतीमध्ये मृण्मयीने जुन्या आणि नव्या कुटुंबपद्धतीतील फरक स्पष्ट केला. ती म्हणते, 'आज आपल्याला कामही करायचेय, पैसे कमवायचेत, शिक्षणासाठी पैसा हवाय. हे सगळे मॅनेज करणे कठीण होत चालले आहे. एका फ्लॅटमध्ये राहणाऱ्या नवरा, बायको आणि त्यांच्या दोन मुलांना सगळ्या गोष्टी सांभाळायच्या आहेत. त्यामुळे ही तारेवरची कसरतच आहे. आजकाल मुलांना मोबाईल देण्यावरुन सगळे शिव्या देतात. अरे पण काय करायचे? आईबापाने हे गणित कसे सोडवायचे? त्यांना दोन मिनिटे कधी मिळणार? मी याबाबत पूर्णपणे आईबापांना दोष देणार नाही. कदाचित हे बरोबर नाही, पण करणार काय? ही सगळी गणिते आहेत. यात चूक किंवा बरोबरचे उत्तरच देता येणार नाही.' मृण्मयीने हे मत मांडताना आजच्या आईबाबांचा संघर्ष स्पष्ट केला.



## अनोख्या नावाचे मराठी चित्रपट

सध्या नवनवीन मराठी चित्रपट एकापाठोपाठ प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. काही चित्रपट अनोख्या वैशिष्ट्यांमुळे चर्चेचा विषय ठरले आहेत. 'मनाचे श्लोक' हा मृण्मयी देशपांडेचे लेखन आणि दिग्दर्शन असलेला चित्रपट वेगळ्या विषयामुळे आणि नावामुळे लक्ष वेधून घेत आहे. मृण्मयी देशपांडे, राहुल पेठे, सुव्रत जोशी, सिद्धार्थ मेनन, शुभांगी गोखले, लीना भागवत, मंगेश कदम आणि उदय टिकेकर यांसारखे कलाकार या चित्रपटात आहेत. दोन स्वतंत्र व्यक्तींच्या म्हणजे मनवा आणि श्लोक यांच्या आजकालच्या प्रेमाच्या संकल्पनेची चर्चा या चित्रपटात केली आहे. दोन्ही व्यक्ती पारंपरिक विवाहाच्या कल्पनांवर प्रश्न उपस्थित करतात आणि कौटुंबिक अपेक्षांचा सामना करत त्यांची कथा हास्यतुषारांसह उलगडत जाते.

विशेष म्हणजे चित्रपटाच्या ट्रेलर लाँच कार्यक्रमात टीमने महाराष्ट्रातील पूरग्रस्त जिल्ह्यांसाठी सुमारे अडीच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. त्यामुळे मराठी चित्रपटसृष्टीचा माणुसकीचा दृष्टिकोन अधोरेखित झाला आहे.

सुबोध भावे आणि मानसी नाईक अभिनीत 'सकाळ तर होऊ द्या' हा चित्रपटही प्रेक्षक आणि समीक्षकांच्या चर्चेचा विषय बनला आहे. श्रेय पिक्चर कंपनी प्रस्तुत नम्रता सिन्हा निर्मित हा चित्रपट वेगळ्या धाटणीचा आहे. याचे दिग्दर्शन आणि लेखन आलोक जैन यांचे आहे. चित्रपटाची कथा एक भावनिक आणि रोमँटिक ड्रामा आहे. विश्वासघात आणि एकटेपणामुळे निराश होऊन कथेतील नायक अभय आत्महत्या करण्याचा विचार करतो. पण एका गूढ महिलेसोबतची भेट त्याच्या जीवनात नवी आशा आणि प्रेमाची किरणे घेऊन येते. हा चित्रपट प्रेम आणि मानवी संबंधांच्या ताकदीवर आधारित आहे. दोन व्यक्तिरेखांच्या बळावर प्रेक्षकांना अखेरपर्यंत खिळवून ठेवण्याची किमया या चित्रपटात आहे.



## कॉमेडी थ्रिलर 'लॉर्ड कर्जन की हवेली'

सध्या चर्चेत असलेला 'लॉर्ड कर्जन की हवेली' हा एक कॉमेडी थ्रिलर चित्रपट आहे. अंशुमन झा या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. या चित्रपटात अर्जुन माथुर, रसिका दुग्गल, झोहा रहमान, परेश पाहुजा, तन्मय धनानिया आणि अनेक इतर कलाकार प्रमुख भूमिकेत आहेत. हा चित्रपट शिवा दावर यांच्या 'गोल्डन रेशियो फिल्म्स' आणि 'फर्स्ट रे फिल्म्स'अंतर्गत निर्मिला आहे.

ही कथा चार देसी मित्रांभोवती फिरते. जे अनपेक्षितपणे एका डिनरसाठी एकत्र आले आहेत. सुरुवातीला हे डिनर साधे आणि मजेशीर वाटते. पण मित्रांपैकी एकजण अचानक सांगतो की त्याच्या ट्रंकमध्ये एक मृतदेह आहे. हसण्यासारखा हा विनोद हळूहळू थरारक वळण घेतो आणि रात्रीचे संपूर्ण वातावरण बदलते. घटनांची साखळी अनपेक्षित वळणे घेत प्रत्येक पात्राच्या आयुष्यात महत्त्वपूर्ण बदल घडवते. चित्रपटात कॉमेडी आणि थ्रिलर यांचा संगम प्रेक्षकांना हसवणारा तसेच रोमांचक अनुभव देतो. मित्रांमधील संवाद, रहस्य, आणि अनपेक्षित ट्विस्ट प्रेक्षकांना शेवटपर्यंत बांधून ठेवते.



## जिओ हॉटस्टारची नैना मर्डर केस

जिओ हॉटस्टारची 'नैना मर्डर केस' सध्या खूप गाजते आहे. ही कथा आहे एसीपी संयुक्ता या अनुभवी पोलीस अधिकाऱ्याची. एसीपी संयुक्ता ट्रान्स्फरपूर्वी शेवटचा खटला हाताळत असते. हा खटला नैना नावाच्या मुलीच्या गूढ मृत्यूशी संबंधित आहे. संयुक्ताला तरुण आणि महत्वाकांक्षी पोलीस अधिकारी जय कंवल मदत करतो. या रहस्याचा शोध लावण्यासाठी केले जाणारे प्रयत्न, साक्षीदारांचा शोध घेण्याची धडपड आणि अखेरीस त्या साऱ्याला मिळणारा न्याय या कथेत आहे. या वेब सिरीजमधून प्रेक्षकांना रहस्य आणि थराराचा विलक्षण अनुभव मिळतो. कोंकणा सेनशर्मा, सूर्य शर्मा, अंकुर राठी, शालिनी वत्सा, निहारिका लायरा दत्त, श्रुती जॉली, चंदन रॉय, अमित सियाल आणि यशस्विनी दयामा यांनी यात मुख्य भूमिका साकारल्या आहेत. रोहन सिप्पी प्रॉडक्शन्सची ही वेब सिरिज प्रेक्षकांच्या मनाची पकड घेते आहे.



## हॉरर फँटसी 'व्हॅम्पायर सागा'

'व्हॅम्पायर सागा' या आणखी एका हिंदी हॉरर-फँटसी चित्रपटाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन झुबेर खान यांनी केले आहे. या चित्रपटात अब्दुल आदनान, झुबेर खान, सना सुलतान, प्रमुख भूमिकेत आहेत. हा एक सुपरनॅचरल व्हॅम्पायर कथानक भारतीय शैलीत मांडणारा चित्रपट आहे. ही कॉलेजमध्ये राहणाऱ्या एका व्हॅम्पायर कुटुंबाची आणि कॉलेजमधील चार तरुणांची कहाणी आहे. या चित्रपटात ॲक्शन आहे, जादूई शक्ती आहेत. काही अनपेक्षित घटना आहेत. प्रेम, सूड आणि अलौकिक शक्तींचा संगम दाखवणारा हा चित्रपट प्रेक्षकांची उत्सुकता किती चाळवतो, ते आता पहायचे.



## हायफाय 'कंट्रोल'

सफदर अब्बास यांनी दिग्दर्शित केलेला 'कंट्रोल' हा चित्रपट म्हणजे सायबर गुन्हेगारी आणि डिजिटल फसवणूक यावर आधारित थरारपट आहे. चित्रपटामध्ये एक तीक्ष्ण बुद्धीचा अधिकारी मोठ्या प्रमाणात होणाऱ्या ऑनलाइन फसवणुकीचा शोध घेतो. हा कट उघड करण्यासाठी त्या अधिकाऱ्याला स्वतःचा जीव धोक्यात घालावा लागतो. ही कथा एका स्कॅमवर आधारित आहे. डेटाचोरी आणि एआयच्या गैरवापरावर हा चित्रपट प्रकाश टाकतो. तंत्रज्ञानावर किती अवलंबून रहायचे आणि ते माणसाच्या नियंत्रणाबाहेर गेले तर काय होऊ शकते, हा चित्रपटाचा मुख्य विषय आहे. 'अखेर नियंत्रण कुणाकडे? मशीन की माणूस?' या विषयावर हा चित्रपट विचार करायला लावतो. प्रमुख भूमिकेत ठाकूर अनुप सिंह, प्रिया आनंद आहेत तर रोहित रॉय, राजेश शर्मा यासारख्या कलाकारांमुळे चित्रपट अधिक प्रेक्षणीय झाला आहे.



## 'शरिया की संविधान'ची चर्चा!

सोल फिल्म्स द्वारा निर्मित आणि स्वाती चौहान दिग्दर्शित 'साईरा खान केस' एका कोर्टरूम ड्रामा आहे. या चित्रपटाची कथा एका मुस्लिम स्त्रीने न्यायासाठी केलेल्या संघर्षावर आधारित आहे. तलाक, बहुविवाह आणि मुलांची कस्टडी यासारखे विषय या चित्रपटात हाताळले आहेत. एका सत्यकथेवर आधारित असलेला हा चित्रपट समाज, धर्म आणि कायदा या तिन्ही स्तरांवर स्त्रीला भोगाव्या लागणाऱ्या दु;खाला वाचा फोडतो. साईराचा खटला म्हणजे केवळ एका व्यक्तीचा प्रश्न नाही, तर स्त्रियांचे हक्क, धार्मिक ओळख आणि न्यायव्यवस्थेची सत्यता अशा महत्वाच्या मुद्दयांना हात घालतो. वकील आणि मीडिया यांच्या उपस्थितीत ही न्यायालयीन लढाई रंगते. 'शरिया या संविधान' या प्रश्नाचे उत्तर शोधणारा हा चित्रपट शेवटी स्त्रीला न्याय न देणाऱ्या समाजातील दुहेरी मापदंड उघडे पाडतो.



## नवे ॲनिमेटेड 'कुरुक्षेत्र'

'कुरुक्षेत्र' ही एक नवी ॲनिमेटेड मालिका नेटफ्लिक्सकडून सादर केली गेली आहे. अनु सिक्का यांची संकल्पना आणि निर्मिती असलेली ही मालिका 'टिपिंग पॉइंट'ने तयार केली आहे. उजान गांगुली लिखित आणि दिग्दर्शित या मालिकेसाठी प्रसिद्ध कवी आणि गीतकार गुलजार यांनी गीतलेखन केले आहे. कुरुक्षेत्रावरील १८ दिवसांच्या युद्धाच्या शेवटच्या टप्प्यावर १८ प्रमुख योद्ध्यांच्या दृष्टिकोनातून या संघर्षाचे परीक्षण या मालिकेमध्ये पहायला मिळत आहे. ही मालिका त्यांच्या वैयक्तिक कोंडी, सूडबुद्धी आणि भावाला भावाविरुद्ध उभे करणाऱ्या युद्धाचे परिणाम यांचा शोध घेते.

